सचिव विभाग

मा. स्थायी समिति

दि: १५/०८/२३ स: ११:००वा

प्रकरण-क्र - ५२ ते ५८

मूळप्रत

१

१२/१४

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०९/०७/२०१३.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. ०९ :- दिनांक ०९/०७/२०१३**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १५/०७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९, दि. ०९/०७/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०९, दि. ०९/०७/२०१३ सोबतची विषय पत्रिका**

**सभा सोमवार दि. १५/०७/२०१३**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – निरंक |
| ५२ | दि. १४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ५३ | मिरागाव येथे समाजमंदिर खाजगी संस्थेस भाड्याने चालविण्यास देणेबाबत निर्णय घेणे. |
| ५४ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ५५ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ५६ | निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ५७ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- ०९/०७/२०१३.**

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०९, दि. ०९/०७/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. १५/०७/२०१३**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – निरंक |
| ५२ | दि. १४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ५३ | मिरागाव येथे समाजमंदिर खाजगी संस्थेस भाड्याने चालविण्यास देणेबाबत निर्णय घेणे. |
| ५४ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ५५ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ५६ | निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ५७ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- ०९/०७/२०१३.

(सुरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि.१४/०५/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १४/०५/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १४/०५/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. ०७/०५/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
३. श्री. मुन्ना सिंह
४. श्री. प्रमोद जयराम सामंत
५. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
६. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
७. श्री. रोहिदास शंकर पाटील
८. श्री. शरद केशव पाटील
९. श्रीम. मिरादेवी यादव
१०. डॉ. राजेंद्र जैन
११. डॉ. रमेश जैन
१२. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१३. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी

**गैरहजर सदस्य --**

१. श्रीम. अनिता जयवंत पाटील
२. श्री. राजेश शंकर वेतोसकर
३. श्री. संदिप मोहन पाटील

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत करतो, सचिव साहेबांनी सभेच्या कामाकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १४/०५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३, दि.०७/०५/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.प्रकरण क्र. १९ दि. २१/०३/२०१३ ची प्रोसिडींग काही कारणास्तव दिली नाही ती पुढच्या वेळेला देवू

**प्रमोद सामंत :-**

सचिव साहेब, गेल्या स्थायी समितीमध्ये आयुक्त साहेबांनी निर्देष दिले होते इन्फोटेकला काम बंद करायचं ४जी चे तुम्ही आदेश पण दिलेले काम बंद करण्यासाठी तुम्ही आदेश दिल्यानंतर ही पूर्ण शहरभर त्यांच काम चालु आहे तर असं का झालं याची माहिती द्यावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, अनुपालन अहवाल द्यायचा असं आम्ही तुम्हाला सांगितलं होतं ते कुठे अहवाल आहे?

**नगरसचिव :-**

अनुपालन अहवाल देतो.

**शरद पाटील :-**

माझा प्रश्न असा आहे की, आपण छोट्या छोट्या तक्रारी करतो कॅबिन रोड ला एक भंगारवाला आहे तो बाहेर अजुनही माल ठेवतो तो उचलत नाही, तो का उचलत नाही? त्याचे कारण समजत नाही.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

प्रभाग अधिकारी कोण आहे?

**शरद पाटील :-**

प्रभाग अधिकारी मिटींगला येत नाही म्हणजे याचा अर्थ काय? मा. सभापती साहेब हा आपला अपमान आहे.

**प्रमोद सामंत :-**

प्रत्येक वेळी तेच तेच सांगाव लागते प्रभाग अधिकारी नसतात.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांनी पत्र मला दिलेलं होत त्याबद्दल जे कोणी प्रभाग अधिकारी आले नसतील त्यांनी खुलासा केला नसेल तर त्यांच्यावर काय कारवाई करतील ते आयुक्त साहेब सांगतील.

**शरद पाटील :-**

आम्ही केबिन रोडची तक्रार केली आहे त्यांच सामान का उचलत नाही. भंगारवाला दादागिरी करतो. केबिन रोडला रमाकांत कदमच ऑफिस आहे त्याच्या बाजुला तो भंगारवाला कपाट, पलंग हे सगळं ठेवायला लागला आहे त्याच्या बाजूला एखादी गाडी उभी राहते त्याच्यानंतर एखादी गाडी जायला रस्ता नाही.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

पोलिसांना पत्र दिलेले आहे दोन दिवसात काढून टाका.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

ठिक आहे दोन दिवसात काढून टाकतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब अधिकाऱ्यांच्या दृष्टीने या सभागृहाच्या दृष्टीने सांगतो ते ऐकून घ्या देव सगळे खाली यायला लागले त्याच्यावर काय नियंत्रण आहे आमच्या केबिन रोडला प्रशांत हॉटेल कडून निघालं. १,२,३,४,१२,१३,१४,१५,१७,१८ सगळे देव खाली आले त्याच नियंत्रण कोण ठेवतो? देवाला खाली यायचं की नाही यायचं आलं तर त्याच संगोपन सेवा कोणी करायचं? आपल्या महापालिकेच्या कायद्यात याची काय तरतुद आहे? जो उठला तो भिंतीला देव चिटकवायला लागला मार्बल लावतो, प्लास्टर लावतो स्टील चे ग्रील लागायला लागले, लाईट लागायला लागली.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, कसं आहे की, इथे आम्ही तक्रार केली तरच त्याच्यावर कारवाई नाहीतर काही नाही महापालिकेच्या प्रशासनाने कुठेच बघायचं नाही आम्ही तक्रार केल्यानंतर फक्त तुम्ही कारवाई करायची आणि ती पण करायची कशी शरद पाटील ची तक्रार आहे.

**प्रविण पाटील :-**

माझ्या वॉर्डात एवढी मंदीर आहेत मंदीर किंवा धार्मिक स्थळ पकडा कुठल्याही धर्माचे असू दे. एवढं आहे तर मी सांगतो माझ्या वॉर्डला तीर्थक्षेत्र डिक्लेअर करा तुम्ही कुठे जायची गरज नाही एवढ्या जाती धर्माची मंदीर आहेत आणि आपण कारवाई पण करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

चालायला जागा नाही मोटर सायकल चालत नाही, माणुस चालू शकत नाही, शाळेत जाणाऱ्या बाळाला आई घेऊन जाऊ शकत नाही कोणावर जबाबदारी आहे की नाही?

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

याबाबत दोन वेळा मुद्दे सभेमध्ये उपस्थित केले होते त्या अनुषंगाने त्याच्या अगोदर पण सुचना दिल्या होत्या प्रभाग अधिकाऱ्यांची मिटींग घेऊन त्यांना तोंडी आणि लेखी सुचना दिलेल्या आहेत त्याच माध्यमातुन परत आता मंदीराचे किंवा धार्मिक स्थळांचे नाव किंवा त्याचं कारण उभा राहून कारण समोर करुन ते सुध्दा अतिक्रमण पाथपथावर किंवा रस्त्यावर करत असतील तर त्याची पण कारवाई प्राधान्यांनी अतिक्रमण प्रमुख धारका करुन करण्यात येईल त्याप्रमाणे पुढच्या वेळी त्याची तक्रार करण्याची वेळ येऊ देणार नाही ह्याची दक्षता घेऊ.

**शरद पाटील :-**

आम्ही तक्रार केली नाही पण त्याला वेळीच आळा घातला नाही तर असं होतं ना एखादा फेरीवाला चार दिवस बसला तर नंतर सांगतो चालीस साल से बैठ रहा हूँ। तसं आहे ते तुम्हीच वेळीच थांबवलं तर ते होणार नाही ना वेळीच थांबवायला कोण जात नाही, कोण बघतच नाही चालल होतं जाऊ द्या.

**प्रमोद सामंत :-**

मा. उपायुक्त साहेब, सगळी कडेच अशी परिस्थीती आहे आमच्या इथे मंडे मार्केट हलवलं गेलं ते दुसरीकडे स्थलांतरीत केलं आता इतर दिवशी मंडे मार्केट सारखी परिस्थीती आहे हे आपल्या प्रभाग अधिकाऱ्यांना कळत नाही दिसत नाही का? की बघायचं नसतं किंवा डोळे जाणून बुजुन बंद करतात आणि ते जर बघत नसतील तर तुम्ही जाऊन प्रत्यक्ष बघा तुमच्याकडे तक्रारी आहेत प्रत्येकाच्या प्रत्येक वेळी लोकांना तिथे चालायला जागा नसते गेल्या मिटींग मध्ये आपण ठरवलं होतं ना फेरीवाला क्षेत्रामध्ये हे लोक वसुली

करतात त्यावर तुम्ही काही ॲक्शन घेतली का? तुम्ही कोणाला पाठवलं का हे खरोखर वसुली करतात की नाही हे बघायला आम्ही इथे बोलायचं ओरडायचं आठवडा आठवडा पंधरा दिवस काहीच कारवाई होत नाही.

**दिपक सावंत :-**

साहेब, तिथे चेक करायला पाठवलं आहे.

**प्रमोद सामंत :-**

चेक काय केलं? पाठवलं तर ते परत आले नाही का? तुम्ही पाठवलं तर ते रिपोर्ट घेऊन परत आले नाही का?

**मुन्ना सिंह :-**

सावंत साहब, यह तो पिछले मिटींग मे हुआ था चेक करेंगे।

**प्रमोद सामंत :-**

यही मै पुछ रहा हूँ। यह स्टँडींग तक उनलोग वापस आए नही क्या? ज्यांना तुम्ही पाठवलं त्यांनी तुमच्याकडे रिपोर्ट सादर केला की नाही त्या स्टँडींग नंतर ही स्टँडींग या स्टँडींग ला तुम्हाला उत्तर द्यायचं आहे तुमच्याकडे रिपोर्ट तयार आहे की नाही ते लोक वसुली करतात की नाही करतात तुम्ही सांगितलेला आम्ही ठेका रद्द करतो करुन टाका रद्द आम्ही प्रत्येकवेळी स्टँडींग ला धारेवर धरायचं आम्ही रद्द करुन टाकतो असं थोडच चालणार तुम्ही आता आम्हाला रिपोर्ट सांगितला पाहिजे.

**मुन्ना सिंह :-**

सावंत साहब, पिछले टाईम स्टँडींग मे विषय हुआ था आपने बोला था जानकारी लेकर बताऐंगे। तो अभितक जानकारी लेकर हुआ नही? रिपोर्ट मंगाईए हमलोग देखते है।

**प्रमोद सामंत :-**

आम्ही जाणार नाही आम्ही रिपोर्ट घेऊनच जाणार काय आहे किती ना फेरीवाला क्षेत्र आहे? कुठे ते लोक बसतात आणि त्यांच्याकडुन तुम्ही किती वसुली करतात ते आम्हाला सांगा आम्ही एवढं सगळं बोलतो तुम्ही आमचा विचार करत नाही.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब आमच्या इथे फुट वर्क ब्रिज बंद झाला आहे. लोकांना खुप त्रास होतो. केबिन रोडला जे लोक राहतात त्यांना स्टेशनलाच जायला लागत. किती दिवस झाले त्याच कामच पुर्ण होत नाही.

**मुन्ना सिंह :-**

मैने कॉन्ट्रॅक्टर से जानकारी लिया था। तो वह बोल रहे थे ३१ मे तक खतम हो जाएगा।

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो १५ ते २० दिवसात काम पूर्ण होईल.

**शरद पाटील :-**

तुम्ही जेव्हा तोडायला घेतलं होत तेव्हा मी बारकुंड साहेबांना भेटलो होतो तेव्हा बारकुंड साहेब बोलले १५ दिवसात आम्ही तयार करतो.

**दिपक खांबित :-**

साहेब, खाली अडचणी होत्या सगळ्यांना शिफ्टींग करता करता अजूनही टपऱ्या आहेत शौचालय आहे.

**शरद पाटील :-**

खालच्या बांधकामाच्या कुठल्याही शिफ्टींगचा प्रश्न आला नाही मला वाटते स्वप्नील सावंत साहेब दिड पावणे दोन महिन्या अगोदर तोडायला आले होते. म्हणजे एवढी घाई होती एवढं वॉर्ड फुटींगवर काम होणार होतं की त्याची अडचण होती तोडायला आले होते. आजच्या आज खाली करायचे दोन दिवसात ह्या माणसाचं सामान खाली करायला सुध्दा दिले नाही. काही नाही खाली करायला पाहिजे.

**मुन्ना सिंह :-**

वह जो बोल रहे है वह बराबर बोल रहे है। नीचे पूरा ऐसे ही पडा है। तोडा है वह ऐसे ही पडा है हटाया नही उधर से।

**शरद पाटील :-**

तेवढं असताना कोणाला हटवायचं तर मला वाटत नाही खांबित साहेब तिथे तुम्हाला कोणाला हटवायला त्रास झाला असेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहब मेरे वॉर्ड मे भी सुदामा नगर के पास ब्रिज जोडा गया है जो तोडने का काम कर लिया है जो मेन काम था वह छोड दिया है। ठेकेदार को २० बार फोन किया था जो तोडनेका मेन काम है वह तुट नही रहा है पैसा पुरा देंगे जाने क्या करेंगे लेकीन काम अभितक नही हो रहा है।

**मा. सभापती :-**

अभी साहब ने बताया १५ दिन मे पुरा हो जाएगा।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह जो बात कर रहे है वह अलग है और मे मेरे वॉर्ड की बात कर रहा हूँ। कॉन्ट्रॅक्टर को काम देने का नही या फिर पुछने का नही काम होता है की नही होता है। जबाबदारी जरा भी है ही नही। ऐसे होता है क्या? कब काम चालु किया था अभितक ऐसे ही पडा है।

**प्रमोद सामंत :-**

इंन्फोटेक ची माहिती विचारली आहे तर ती माहिती द्यावी ना.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

एक बार चालु हुआ तो बंद क्यो पडा वह हमको बताओ।

**मा. सभापती :-**

डॉ. साहब यह सारी जानकारी के लिए अधिकारी के केबिन मे जाईए उनको उपर पुरी माहिती लेके नेक्स्ट मिटींग मे लेकर आईए। अगर उसपर डिले होता है तो..

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अधिकारी के केबिन मे जाने के बाद बोलते है टाईम नही है यह नही है आप कल परसो आना हमारे पास काम नही है क्या ऐसे बोलते है आप यह पुछिए जो काम बोल रहे है उसका अॅग्रीमेंट वर्क ऑर्डर कब का था? पुरा कब होना चाहीए? हमको जरा बताईए ना। काम आपका है ना।

**दिपक खांबित :-**

माहिती नाही आहे, मी माहिती घेऊन पुढच्या मिटींगमध्ये सांगतो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

माहिती नही है तो आप बोलते है की पुरा हो जाएगा। बिना देखे बिना माहिती के आप बोल कैसे सकते है। आप बोल रहे है माहिती मंगाऊंगा तो बिना माहिती के आप बोल कैसे सकते है। आप बोल रहे है माहिती मंगाऊंगा तो बिना माहिती के आप बोल कैसे सकते हो?

**प्रमोद सामंत :-**

साहेब, इन्फोटेकची काम चालू आहेत. सगळीकडे तुम्ही आदेश दिले. तुमचे आदेश जुगाडून सगळीकडे कामे चालू आहेत. आम्हाला फोन करायला लागतात.

**दिपक खांबित :-**

पुढील कंपनीची जी मुदत होती ती १० मे पर्यंत होती. त्याला आपण मागच्या मिटींगला ठरल्याप्रमाणे सगळ्यांना सांगितल काम बंद करा. त्याने नवीन कामे कुठलीच केलेली नाही. फक्त त्यांनी जे खड्डे मारलेले आहेत तेच त्यांनी बुजवायची काम घेतलेली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

नाही. आपण चेम्बर्स बनवत होते ना. ती चेम्बर्स बनवू नका. काम जस आहे तस बंद करा. असे आदेश मा. सभापती साहेबांनी दिलेले आहे. आणि अस असताना ते लोक कंटीन्यू काम करतात. त्यावरती आपल्या एकाही जे.ई.च सुपव्हाईजरच किंवा ज्यांना ऑथोरीटी असतील त्यांच कुठेही कंट्रोल नाही आहे. मी सॅटरडेला तुम्हाला फोन करुन सांगितल काम सुरु आहे बंद करा. तुमच अस म्हणन आहे का की, आम्ही त्यावर सुपर व्हिजन केल पाहिजे. आम्ही सांगितल पाहिजे.

**दिपक खांबित :-**

सगळे खड्डे तर बंद करायला पाहिजे ना.

**प्रमोद सामंत :-**

खड्डे म्हणजे चेंम्बर बनवून बंद करा. म्हणून सांगितल का तुम्ही? चेंबर बनवा अस तुम्ही त्यांना सांगितल का?

**दिपक खांबित :-**

चेंम्बर बंद आहे. चेंम्बर चालू नाही.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेबांनी आदेश दिलेले त्यांची कामे आहे त्या परिस्थितीत बंद करा.

**दिपक खांबित :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

बरोबर आहे. तुम्ही त्यांना काय आदेश दिले की, चेंम्बर बनवा मग काम बंद करा असे आदेश दिले का?

**दिपक खांबित :-**

नाही. माती भरुन सगळी कामे बंद करा. नविन कामे कुठलीच करायची नाही.

**प्रमोद सामंत :-**

त्यांनी सगळीकडे चेम्बर बनवायच काम सुरु केल त्यावर मी तुमच्याशी बोलतो. त्याची तुम्हाला कुठे माहिती आहे का?

**दिपक खांबित :-**

नाही. तुम्ही फोन वर माहिती दिली तेवढीच माहिती.

**प्रमोद सामंत :-**

मी तुम्हाला माहिती दिली त्यावेळी तुम्हाला माहिती कळली. तेच सांगायच आहे की, आपल्या कुठल्याही व्यक्तिच सुपर व्हाईजर. ज्युनियर इंजिनियर, एक्झीक्युटीव्ह इंजिनियर, डेप्युटी किंवा आणखीन कोणाचा त्यावर कुठलाही कंट्रोल नाही आहे. आपण त्यांना अस वाऱ्यावर सोडून दिल आहे. त्यांनी आपल्याला जी काय फीज भरायची असेल ती भरली. तुम्ही हवे तिथे खड्डे करा. हवे तिथे लाईन टाका. हवे ते करा. मा. सभापती साहेब माझ स्पष्ट निवेदन आहे. ती इन्फोटेक कंपनी आहे ना त्यांना ह्यापुढे कुठलीही परमिशन दिली नाही पाहिजे. पावसाळ्या आधी जेवढे खड्डे असतील जिथे त्यांनी चेम्बर बनवले ठिक आहे. जिथे नाही बनवले असतील तिथे सगळे खड्डे बंद करा. त्यांना एकही फायबर टाकायला उघडू देता कामा नये. कारण त्यांना तुम्ही दिलेले आदेश जुगाडून काम केलेले आहे.

**राजेंद्र जैन :-**

केबल डालने का काम चालू है। आपके सत्ता पक्ष के स्थायी समिती के अध्यक्ष की आदेश की खुलेआम अवहेलना हो रही है। आपके अधिकारी के द्वारा यह आपके लिए अच्छी बात नहीं है।

**मा. सभापती :-**

ऐसी बात नहीं है। मुझे बताया था जो खोदा गया है। उसका ..........................

**राजेंद्र जैन :-**

बेकायदा केबल डालने का काम चालू है।

**मा. सभापती :-**

काम बंद है।

**राजेंद्र जैन :-**

चालू है। हमने देखा है।

**मुन्ना सिंग :-**

साहब, केबिन रोड पे साईबाबा ट्रॅव्हल्स के सामने एक चेंम्बर बनाया है। उसकी मिट्टी की है, वह पॅच वर्क करके गए। अभी वहाँ ऐसा खड्डा हुआ है की, वहाँ हर बाईक गिर रही है।

**मा. सभापती :-**

खांबित साहेब, त्यांना काम बंद करायला सांगा.

**दिपक खांबित :-**

साहेब, त्यांना सांगितलेल आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब काऊंटींग केलेला रस्ता खोदून त्यांनी चेम्बर बनवला आहे. जो रस्ता सहा महिने बनला नव्हता. तो रस्ता सहा महिन्यानंतर बनवायला घेतला. तो रस्ता काऊंटिंग झाल्यानंतर परत खड्डा केला. मा. उपायुक्त साहेब त्यावर आपण काय कारवाई करतो त्या इन्फोटेक कंपनीने सभापतींचे आदेश मानलेले नाही.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

पावसाळ्यापूर्वी जे प्रिकॉशनरी म्हणून तांत्रिक दृष्ट्या अप्लाय करायला पाहिजे. त्याप्रमाणे जे काम बंद ठेवायला पाहिजे किंवा त्यामध्ये काही सुधारणा करायला पाहिजे त्याप्रमाणे त्या यंत्रणेकडून तात्काळ सुधारणा करुन घ्यायची. कार्यवाही करावी आणि त्याच्यामध्ये तक्रारी यायला पाहिजे किंवा ...................

**प्रमोद सामंत :-**

साहेब, मी काहीतरी वेगळ बोललो तुम्ही काहीतरी वेगळ बोललात. मी बोललो त्यांना आदेश दिलेले असताना ते आदेश झुगाडून त्यांनी पुन्हा चेम्बर बनवायला घेतली. त्याच्या बद्दल काहीतरी बोलाना. त्यांनी आता अस केल त्याबद्दल काय कारवाई करणार?

**दिपक खांबित :-**

इन्फोटेल या कंपनीने शासनाच्या धोरणानुसार आहेत. त्याने ६५ कि.मी. चे पैसे भरलेले आहेत. त्याप्रमाणे त्यांना आपण परमिशन दिलेली आहे. आत स्टॅंडिंगमध्ये चर्चा झाली. त्याप्रमाणे आम्ही आयुक्त साहेबांकडे पूटअप करु. मा. आयुक्त साहेबांच्या निर्णयानुसार आम्ही काम करु.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, परत तेच बोलतात. आपण कुठेतरी मध्ये अडकता.

**दिपक खांबित :-**

आयुक्तांना कळवायच ना. त्यांनी ६५ कि.मी. चे पैसे भरले आहे. ते गव्हर्मेंटच्या ऑर्डरप्रमाणे आहे.

**प्रमोद सामंत :-**

त्याने केबल लेन केली. खड्डे बुजवले त्यावर तर करायच बाकी होत त्याने परत खड्डे खोदले.

**दिपक खांबित :-**

आणि आपल्या कडेच नाही नवी मुंबई .............

**प्रमोद सामंत :-**

नवी मुंबईच आम्हाला नाही बघायच.

**दिपक खांबित :-**

सगळीकडे हिच स्किम सुरु आहे.

**प्रमोद सामंत :-**

नवी मुंबईचा रेव्हेन्यू भरपूर आहे. नवी मुंबई वेल प्लान्ट आहे. आमच्याकडे चालायला रस्त्यावर जागा नाही आहे.

**राजेंद्र जैन :-**

नाशिक मे क्या होता है वह हमको मालुम है। दुसरो की बात करने की क्या जरुरत है। इधर नाशिक की बात करो। नाशिक में छापा मारा है इधर भी छापा मारना है क्या? नवी मुंबई की बात क्यों करते हो यहाँ की बात करो ना। नाशिक में कितने पकडे गये यहाँ भी सब को पकडवाना है क्या?

**मा. सभापती :-**

साहेब, हा चर्चेचा विषय नाही. तुम्ही विषय बदलू नका. त्या विषयाला धरुनच चर्चा करा आणि साहेबांनी आयुक्तांकडे पूटअप केल आहे. त्या आधारे ................

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, तुमच उत्तर एकच द्या. त्यांना दिलेले कॉन्ट्रॅक्ट ६५ कि.मी. च ते आपण बंद करु शकतो किंवा नाही? ह्याच एक उत्तर मिळाल की .............

**दिपक खांबित :-**

बर्नड साहेब, आयुक्त साहेबांच्या मान्यतेने परवानगी घेतलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

म्हणजे आम्ही इथे ठरवायच नाही. मा. आयुक्त साहेबांनीच काय ते ठरवायच. आम्हाला कोणतीही जबाबदारी नाही.

**दिपक खांबित :-**

हो. आम्ही इकडे आयुक्त साहेबांच्या वतीनेच उत्तर देतो.

**प्रमोद सामंत :-**

आमच्याकडे कुठलीच रिस्पॉन्सीबीलिटी नाही का? आम्ही कुठलेच आदेश द्यायचे नाही का? मा. सभापती साहेबांचे आदेश चालणार नाही का? तुम्ही सांगाव तस त्यांचे आदेश चालणार नाही म्हणून.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीचे वेगळे अधिकार आहेत. मा. आयुक्त साहेबांचे वेगळे अधिकार आहेत.

**प्रमोद सामंत :-**

ह्या अधिकारात आम्ही ते काम बंद करु शकतो की नाही. सभापती साहेबांचा आदेश मानला जातो की नाही. पुढच्या वेळी आम्ही असा विषय घेणार नाही. आयुक्त साहेबांकडे जावू.

**दिपक खांबित :-**

आम्ही स्थायी समिती ने जे काय विषय इकडे माडंतात, जी काही चर्चा होते त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेबांना मी नोटिंग करतो. आणि आयुक्त साहेबांचा आदेश घेऊनच मी कारवाई करतो.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती साहेब, कुठल्याही कामाबद्दल ह्या ठिकाणी स्थायी समिती किंवा आयुक्त किंवा प्रशासन ह्याच्यामध्ये कॉन्ट्रॅक्टरी किंवा डिस्ट्रबन्सी दिसत असतील. आता खांबित साहेबांनी सांगितल की ही जी काही चर्चा झालेली आहे. त्या अनुषंगाने त्यांनी प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे दिला आहे. त्याप्रमाणे चर्चा किंवा अंतिम लायसेंसिंग ऑथोरिटी आहे. त्याबाबत आयुक्त साहेब निर्णय घेतील ना. तो निर्णय घेणारच नाही. तुमच्या सुचना ह्या सभागृहाच्या सुचना ते डावलूनच निर्णय घेतील. अस भाकीत निर्माण करण्याच काही कारण नाही. फक्त विषय काय आहे की, पावसाळ्यापूर्वी जर काम तात्काळ बंद नाही केल तर उद्‌भवणाऱ्या समस्या त्या उद्‌भवू नयेत म्हणून आपण त्या मांडलेल्या आहेत. त्याप्रमाणे उपाययोजना काय करण्यात येईल ते दक्षता घेण्यात येईल.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, पावसाळ्यापूर्वीचा विषय नाही आहे. माझा विषय असा आहे सभापती साहेबांनी आदेश दिले. आदेश दिल्यापासून आतापर्यंत काम चालू आहे. तर त्या पर्टीक्यूलर कंपनीने किंवा त्या संस्थेने काम चालू ठेवायच की नाही ठेवायच हा विषय आहे. तुम्ही ते सांगा त्यांनी ठेवल तर चालू शकते. जोपर्यंत मा. आयुक्त साहेब आदेश देत नाही तोपर्यंत काम चालू ठेवल तरी चालू शकत अस असेल तर तस स्पष्ट सांगा.

**प्रविण पाटील :-**

करारानुसार पण काम करत नाही. ज्या ठिकाणी ६ डक्सची त्याला परमिशन आहे. तिथे त्याने ७ डक्स टाकलेल्या आहेत. आणि त्याच्यावर आपला जे.ई. पण नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहब, यही बात स्थायी समिती के अंदर सावंत साहब ने बोला आपने रुलिंग दिया मांजरेकर साहबने बोला मै बंद करता हूॅं। जब यही जवाब देना था की आयुक्त साहब डिसाईड करेंगे तो उस टाईम वैसे क्यो बोला गया। उसने बोलना चाहीए था आयुक्त साहब से चर्चा करके जवाब देंगे। लास्ट टाईम मे क्या बोला था अमन को देते है।

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहब अभी अगले मिटींग मे साहब बतायेंगे ना।

**प्रमोद सामंत :-**

साहेब अगले मिटींग पर्यंत काम पूर्ण करुन ती कंपनी घरी जाणार आहे.

**मा. सभापती :-**

त्यांच पुढचं काम बाकी असेल ना.

**प्रमोद सामंत :-**

काही नाही बाकी

**दिपक खांबित :-**

त्या कंपनीने डक्स टाकल्याशिवाय एकही केबल खेचली नाही अजूनपर्यंत ह्याच्यामध्ये

**प्रविण पाटील :-**

डक्स टाकली तर केबल खेचायला किती वेळ लागणार आहे?

**दिपक खांबित :-**

ते आयुक्तांचे अधिकार आहे ना.

**प्रविण पाटील :-**

अधिकार आयुक्तांचे आहेत पण त्यांनी जो करार केलेला आहे त्या करारानूसार तो काम कुठे करतो एकतर त्याने खड्डा नियमानूसार खोदलेला नाही दुसरी गोष्ट त्याने डक्स नियमानूसार टाकलेले नाही ज्या डक्स चे पैसे भरले ना तिथे त्याने टाकले नाही.

**दिपक खांबित :-**

कुठे केलं सागा ना? कुठलं ठिकाण आहे ते सांगा? रस्ते केले. त्याठिकाणी पाहणी करुन कार्यवाही करु.

**प्रमोद सामंत :-**

ठिक आहे आयुक्त साहेब नव्हते खांबित साहेब मला एवढं सांगा मा. सभापती साहेबांनी त्यावेळेला ...

**दिपक खांबित :-**

साहेब, मी तुम्हाला सांगतो मी त्यांची खोदाई परमिशन त्याच दिवशी बंद केली त्यानंतर त्यांच्या ऑफिस मधले जे काही त्यांचे मोठे मोठे ऑफिसर आहे ते आपल्याकडे आले होते त्यांनी आयुक्तांशी चर्चा केली पण मला आयुक्तांशी त्यानंतर बोलायला मिळालं नाही ती फाईल आयुक्त साहेबांकडे तशीच राहिली.

**प्रमोद सामंत :-**

मला एका वाक्यात उत्तर सांगा मा. सभापती साहेबांनी आदेश दिले त्यानंतर त्यावर कमिशनर साहेब फाईनल आदेश देणार ठिक आहे पण मा. सभापती साहेबांनी आदेश दिल्यानंतर कमिशनर साहेबांचे आदेश होईपर्यंत काम चालू ठेवायचं की बंद करायचं याबद्दल मला फक्त सांगा.

**दिपक खांबित :-**

साहेब, मा. सभापती साहेबांच्या आदेशानूसार त्या कंपनीच्या लोकांना मी सांगितलं खोदाई परमिशन बंद करा परंतु त्यांनी बंद केली नाही त्यांच म्हणणं होतं की, आम्ही आयुक्त साहेबांशी चर्चा करु आम्ही आयुक्तांकडुन परमिशन घेतलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

आपण सगळच सांगतात मला फक्त एकच सांगा मा. सभापती साहेबांनी आदेश दिले कमिशनर साहेबांनी आदेश केले नाही तर कमिशनर साहेबांचे आदेश येईपर्यंत ते काम चालू राहिलं पाहिजे की बंद राहिल पाहिजे तेवढं सांगा चालु राहिलं पाहिजे तर हो म्हणून सांगा.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती साहेब ते काय सांगतात की, चर्चा झाल्याप्रमाणे त्या कंपनीला काम बंद ठेवल्याबाबत सुचना केल्या आहेत.

**शरद पाटील :-**

उपायुक्त साहेब, त्यांनी चर्चा झाल्यानंतर कंपनीला काम बंद करायला सांगितलं आणि ते कंपनीने बंद केलं नाही ह्याचा अर्थ काय?

**प्रमोद सामंत :-**

त्यासाठी काय करणार आहे हेच मला विचारायचं आहे.

**दिपक खांबित :-**

त्यांनी नविन काम केलं नाही त्यांनी ६५ पैकी ५७ कि.मी. केबल टाकले.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, हा विषय इकडे तिकडे होतो. मला काय हवं ते कळत नाही जे काम चालु करायला तुम्ही बंद केलं जे काम चालु आहे हा आम्ही इथे खड्डा केलेला आहे आणि खड्डा करायचा मी बंद केला आहे तर त्याने दुसरीकडे जाऊन खड्डा केला नाही पण त्या खड्डयाच्या कामाच काय? चेम्बरचा विषय होता ना चेम्बर बनली की नाही बनली तेवढं सांगा मला.

**दिपक खांबित :-**

चेम्बर बनले ना.

**प्रमोद सामंत :-**

त्यावर तुम्ही काय कारवाई करणार? मा. सभापती साहेबांचे आदेश त्यांनी मानले नाही.

**दिपक खांबित :-**

कारवाई करायचे अधिकार आयुक्तांचे आहेत आयुक्तांचे अधिकार वेगळे आहेत स्थायी चे अधिकार वेगळे आहेत.

**प्रमोद सामंत :-**

आयुक्त साहेब इथे आहेत त्यांनी सांगावं चेम्बरच काम त्यांनी चालु ठेवलं तर त्यांच्यावर काय कारवाई करणार? आम्ही चेम्बरचं काम बंद करायला सांगितलेलं.

**दिपक खांबित :-**

मा. आयुक्त साहेब, डिसीजन घेतील ना.

**प्रमोद सामंत :-**

मग द्या ना गेल्या वेळेचा विषय आहे ह्यावेळी पून्हा तेच आहे पुन्हा आपण पुढच्या वेळेला घेणार त्यावेळी पण आयुक्त नसणार आतापर्यंत एकाच मिटींगला आयुक्त होते. आम्ही मिटींग सोडून सगळ्यांनी आयुक्तांकडे जायचं का आता?

**रोहिदास पाटील :-**

आता येणारचं नाही असं काही नक्की फायनल झालेलं आहे का? मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेब पहिल्या दिवशी मंत्रालयात जायंच म्हणुन आपण नीटनेटकं स्वागत केलं आपली ही त्यांनी ओळख करुन घेतली ती सभा बरी झाली असं आपल्याला वाटलं आणि नंतर काही शिक्कामोर्तब झाला का? की आता ह्या स्थायी समितीचा कार्यकाल संपेपर्यंत आयुक्त साहेब येणारच नाहीत असं आहे का? आणि ढगे साहेब तुम्ही येता तर पॉवर घेऊन येता.

**प्रमोद सामंत :-**

आम्ही असं म्हणतो की ते पॉवर घेऊन येतात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अशाच पोजिशन मध्ये येता ही सभा तुमच्याकडुन अपेक्षा करते आम्ही असं समजतो की तुम्ही त्यांच्याकडुन पॉवर घेऊन येतात. आम्ही तुम्ही काही बोलणारचं नसेल, उत्तर देणारचं नसेल हे डायरेक्ट जाहिरात चालेल तर कसं काय? तुम्ही तुमच्या अधिकारात जेवढं तुम्हाला योग्य बोलता येईल तेवढं बोला आयुक्तांचे आदेश ओव्हर टेक करु नका काहीतरी बोलालं की नाही ते उत्तर देतील आमचं मत आहे की तुमचं उपमत काय आहे? मा. सभापतींना खुश ठेवणं हे तुमचं काम आहे खांबित साहेबांच काम नाहीच आहे.

**मा. सभापती :-**

बारीश नजदिक आ रहा है उसके लिए उनको मुदत खतम हो रही है। उन्होंने किया होगा लेकीन अपना भी है ना उसमे बारीश नही होता तो कारवाई करनेके लिए बोलता था लेकीन बारीश आ रहा है।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब आता काकांनी जो विषय ठेवला कमिशनर साहेबांनी यायला पाहिजे ना म्हणजे स्टँडींग साठी कमिशनर येत नाही अशातला भाग नाही ना.

**दिपक खांबित :-**

साहेब हा जो मी विषय सांगतो तो ११ मे च्या पूर्वीच्या सांगतो ११ मे ला त्यांची परमिशन संपलेली आहे त्यांना अजूनपर्यंत काही मुदतवाढ दिलेली नाही ते येऊन आयुक्त साहेबांना भेटून गेले आयुक्त साहेबांनी त्यांच्याकडुन सगळे पेपर घेतले चर्चा केली परंतु, अजूनपर्यंत मुदतवाढीसाठी माझी त्यांची भेट झाली नाही म्हणून दिलेली नाही. ११ मे नंतर सुध्दा जे आम्हाला काम दिसलेलं आहे ते आम्ही थांबवलेलं आहे.

**प्रमोद सामंत :-**

खांबित साहेब, तुम्ही आम्हाला चुकवू नका.

**दिपक खांबित :-**

११ मे नंतर आमच्या निदर्शनास जे काम आलेली आहे तेवढी सगळी कामे थांबवलेलं आहे.

**प्रमोद सामंत :-**

आपली गेली मिटींग किती तारखेला झाली?

**दिपक खांबित :-**

साहेब, मी ११ मे नंतरच सांगतो ११ मे नंतर परमिशन संपली त्यानंतर आम्ही सगळी कामे थांबवली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

आपण त्यांच काम कधी थांबवलं?

**दिपक खांबित :-**

२६ तारखेला.

**प्रमोद सामंत :-**

२६ तारखेला आपली मिटींग होती की २४ तारखेला होती? २४ तारखेला सगळ्यांना फोन करुन तुम्ही काम थांबवली आहेत.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीचा मान राखून मी आयुक्तांना न विचारता सगळी कामे थांबवली.

**प्रमोद सामंत :-**

तुमचा आभारी आहे २४ तारखेनंतर आज १४ तारखेपर्यंत त्यांची कामे चालु आहेत ती कामे चालु ठेवणं बरोबर आहे की चुक तेवढं मला सांगा बरोबर असेल तर मी काहीच बोलणार नाही.

**दिपक खांबित :-**

त्यांची परवानगी तेव्हा रद्द करायला पाहिजे होती पण त्यावेळेला डिसीजन नाही झाला की त्यांची परवानगी इमिजीएट रद्द करायची का? ११ मे च्या पुर्वी त्याच्यावर डिसीजन मधल्या काळात होऊ शकलं नाही त्यामुळे ती कामे चालू राहिली असेल.

**प्रमोद सामंत :-**

त्यांच तुम्ही डिसीजन केलं नाही तरीपण हे काम पुढचं चालु राहिलं पाहिजे की नाही राहीलं पाहिजे तेवढं मला सांगा.

**दिपक खांबित :-**

११ मे नंतर नाही राहिलं पाहिजे.

**प्रमोद सामंत :-**

त्या दिवसापासून ११ मे पर्यंत चालु राहिलं पाहिजे की नाही तेवढं सांगा ११ मे नंतर नाही आहे ते सगळ्यांना माहिती आहे.

**दिपक खांबित :-**

त्यांनी तसं लेखी आम्ही कळवलं नाही म्हणुन रहायला पाहिजे.

**प्रमोद सामंत :-**

मग ती तुमची चुक आहे का? प्रशासनाची चुक आहे का?

**दिपक खांबित :-**

आमच्या को-ऑर्डीनेशनमुळे थोडासा गॅप पडला चुक नाही हे तुमचं म्हणणं आहे. तुमचं म्हणणं आयुक्तांनी मान्य करायला पाहिजे ना.

**प्रमोद सामंत :-**

आमचं स्टँडींगचं असं म्हणणं आहे की, प्रशासनाने ती चुक केली आहे त्याच इमिजीएट निर्णय घेतला नाही चालु ठेवली पाहिजे की नाही ठेवली पाहिजे स्टँडींग त्या त्या दिवशी कळवलं नाही.

**दिपक खांबित :-**

अहो, ह्याच्यामध्ये कायदेशीर प्रश्न सुध्दा उद्‌भवू शकता त्यांनी आपल्याकडे पैसे भरलेले आहेत.

**प्रमोद सामंत :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये ८०० डक्स कायम, ८०० खड्डे कायम राहण्याची परमिशन त्याने कुठे घेतली आहे?

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये गव्हर्नमेंटच्या सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञानातुन सुध्दा चौकशी केली त्यांनी डिसकस केलं की हे चेम्बर वेगळं बनवायला पाहिजे तो बोलला नाही ह्याच्यात चेंम्बरचं वेगळं नाही आहे चेम्बर हे त्यांना १५० मीटर मध्ये येतातच.

**प्रमोद सामंत :-**

१५० मीटर पेक्षा कमी अंतरावर चेंम्बर असणार तर काय करणार?

**दिपक खांबित :-**

जर तिकडे जॉईड वगैरे असेल रोड क्रॉस होत असेल तर असतील ना टर्निंग तर असतात ना रोडला.

**प्रमोद सामंत :-**

ते तुम्ही म्हणता मी म्हणतो, पण असं कुठे आहे का त्यांनी दिलेल?

**दिपक खांबित :-**

असं कुठे नाही.

**प्रमोद सामंत :-**

चेम्बर असं कुठे दिलेलं आहे का? १६ सदस्य इथे बसलेले आहेत १६ सदस्यांमध्ये मला सांगा की, त्यांनी आपल्या शहरामध्ये ८०० खड्डे कायमचे हवे आहेत का? आपण ८०० झाकणं सांभाळायची का? मला सांगा.

**दिपक खांबित :-**

जर नविन टेक्नॉलॉजी आहे सगळं काही करतात तर ते होणारच चेम्बर होणारच ना.

**प्रमोद सामंत :-**

मला पण नविन टेक्नॉलॉजी पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, तुमच्या उत्तराला माझी संमती आहे बरोबर आहे आपल्याला काहीतरी विकास करायचा आहे, नविन आहे ३जी असो, टेलिफोन असो, इलेक्ट्रीसिटी असो. सर्वांना लागते त्यांच्या म्हणण्याचा उद्देश तेवढा आहे की, त्यांना परमिशन देताना खड्डे कोणत्या पध्दतीने किती असावे शहराचं रस्त्याचं एकदम वाट लावायची की, कोणत्या पध्दतीने इथे नियम दिले.

**प्रमोद सामंत :-**

पाण्याची एखादी लाईन तुटली ना आणि आपण जर रस्त्यावर खड्डा केला ना तर त्याला आपण फाईन मारतो ५-५, १०-१० हजार रुपये आणि त्यांना खड्डा करु देत नाही काम बंद ठेवतो पाणी नाही आलं तरी चालेल रितसर परमिशन घ्या असे आपण सांगतो.

**दिपक खांबित :-**

भरलेत ना पैसे.

**प्रमोद सामंत :-**

खांबित साहेब, कुठे पैसे भरले?

**मुन्ना सिंह :-**

टँकर का थोडी भरा है। रोड खोदने का भरा है।

**दिपक खांबित :-**

जिथे खड्डा खोदणार आहे तिकडे स्वतः खर्च करणार आहेत.

**प्रमोद सामंत :-**

पूर्ण खड्डे बुजवणार आहेत स्वतः खर्च करुन.

**दिपक खांबित :-**

हो.

**प्रमोद सामंत :-**

नाही ते लोक होल ठेवतात १ मीटरच्या खड्डयामध्ये १ मीटर चे होल ठेवतात आपल्या इथे कायमचे.

**दिपक खांबित :-**

जे खड्डे आहेत तेच बुजवणार आहे.

**प्रमोद सामंत :-**

१ मीटरच्या खड्डयावरती ते लोक झाकणं ठेवणार आहे तो कायमचा खड्डा तिथेच राहणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

खांबित साहेब, हे जे केबल पडते ती काय सिस्टम आहे कोणासाठी उपयोगी पडणार आहे? ह्याचा गावाला काय फायदा आहे ह्याच दोन ओळीत आम्हाला सांगा केवढी ओढाताण चालली आहे खरचं हे काम पूर्ण होणार आहे का? पाऊस येतो हे खरं आहे खड्डे मारलेले खरं आहे. तुम्ही आदेश दिल्यानंतर ही काम चालु आहे हे खरं आहे ते बोलतात ते काय चुकीचं बोलत नाही पण आता ते जे काम चाललेलं आहे त्याचा उपयोग काय?

**दिपक खांबित :-**

इंटरनेट, मोबाईल, नेटवर्किंगसाठी ही केबल टाकली जाते त्या कंपनी मार्फत आणि ही परमिशन आपण देत नाही महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग जे आहे ते आपल्याला ऑर्डर द्यायची असते त्या कंपनीला त्याच्यामध्ये म्हटलं की तुम्ही आम्हाला पैसे भरा, मिरा भाईंदरला एवढे पैसे भरा त्यानुसार परमिशन द्यायची हे अधिकार आयुक्तांना आहे जसे आयुक्तांना आहेत प्रत्येक डिपार्टमेंटला त्यांनी अधिकार दिले आहेत त्याप्रमाणे आपण ते पैसे घेऊन त्यांना परवानगी दिलेली असते गव्हर्नमेंटच्या आदेशानूसार आणि त्याने सबमिट केलं आहे. त्याच्यामध्ये त्यांनी म्हटलं की ते किती चेम्बर टाकणार आहे ते आणि रस्ते खोदाईचे परमिशन द्यायचे अधिकार

हे आयुक्तांचे आहे त्याकरीता स्थायी समितीला विचारायची गरज नाही आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयुक्त हे आहेत सिडको मध्ये...............

**रोहिदास पाटील :-**

गरज नाही असं बोलू नका स्थायी समितीला माहिती द्यायची गरज नक्की आहे.

**प्रमोद सामंत :-**

दर वेळेला स्थायी समितीचा मोठा अपमान केला जातो. गेल्या वेळेला पण तसच झालं होतं आता पण तसच होत स्थायी समितीची गरज नाही म्हणजे हा विषय आम्ही बोलायला पाहिजे असं तुमचं म्हणणं आहे का?

**दिपक खांबित :-**

बोलायला पाहिजे.

**प्रमोद सामंत :-**

मग तुम्ही असं स्टेटमेंट देऊ नका की स्थायी समितीची गरज नाही म्हणून

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीला सन्मान आहे म्हणून तर ..........

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही तर बोललात ना की स्थायी समितीची गरज नाही म्हणुन

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती साहेब, केबलसाठी परवाना देणे, मग महाराष्ट्र शासनाचं असो, महापालिकेचे असो, आयुक्त साहेबांनी परवानगी दिलेली असो ई-रिस्पेक्टीव्ह ऑफ त्यांची परवानगी आहे किंवा त्यांच लायसन्स संपलेलं आहे किंवा नाही किंवा चालु आहे. पावसाळ्याच्या मान्सून पूर्व तयारीसाठी आणि पावसाळ्यामध्ये होणारा धोका किंवा उपद्रव हे विचाराता घेऊन त्यांची काम बंद किंवा तहकुब ठेवणेबाबत त्यांना तात्काळ लेखी किंवा तोंडी सुचना द्याव्यात जर त्यांनी त्या सुचनेचं पालन नाही केलं तर सक्तीची उपाययोजना करुन ते बंद ठेवण्यात यावी मा. सभापती साहेब, हे जर काही विसंगत असेल काही त्रुटी असतील दिलेल्या सुचनांमध्ये त्याप्रमाणे आपण सुधारीत करुन निर्देष द्यावेत त्याप्रमाणे मी त्यांना लेखी कळवतो

**प्रमोद सामंत :-**

साहेब, पावसाळा सगळयांना आहे गेल्या मिटींगमध्ये विषय असा झाला की त्याने चेम्बर बनवायचं कुठेही रितसर आम्हाला कळवलेलं नाही. रितसर परमिशन नाही आहे. मिरा भाईदर शहरामध्ये ७००-८०० खड्डे असेच गटारावरचे झाकणं तुटतात आपण ते वेळेवर लावू शकत नाही आणि एवढे खड्डे आपण सांभाळायचे की नाही सांभाळायचे गेल्या वेळच्या मिटींगला सभापती साहेबांनी आदेश दिले होते आणि ते आदेश झुगारुन त्यांनी ते काम चालु ठेवले हा विषय आहे ह्या विषयावर तुम्ही बोला त्यावर काय करणार ते सांगा?

**रोहिदास पाटील :-**

आता तसा विषय नका घेऊ पाऊस आला आहे काम करु तुमच्या दोन विसंगती मला दिसतात आणि ह्यातले आम्हालाही सिस्टम माहित नाही चेम्बर ठेवणं गरजेचं आहे की नाही हा एक भाग असेल तर ते चेम्बर ठेवायला पाहिजे आता पाऊस येतो की, उदाहरण सांगता पण आमच्या बि.पी. रोडवर खड्डे केले होते काल ते चेम्बर पूर्ण झाले आता ८ दिवस, ५ दिवस जातील तर ते काम आदल्या दिवशी पूर्वी करुन टाका तर तो रस्ता ट्राफिकला मोकळा होईल नाहीतर माणुसच चालू शकत नाही एकतर सक्त आदेश की, आजपासून ते काम बंद होईल आणि दिवाळी नंतर चालु होईल असं असेल तर नाहीतर जे अर्धवट काम आहे ते पूर्ण करु जे गरजेंच आहे ते येईल पुढे या सभागृहाचं मत होईल ना तेव्हा सभागृहाचं मत होईल ना.

**प्रमोद सामंत :-**

काका, माझा विषय असा आहे. इन्फोटेकला हवी ती परमिशन द्या मिरा भाईदर शहरामध्ये तुम्ही ८०० चेम्बर सांभाळायला तयार आहात की नाही?

**रोहिदास पाटील :-**

८०० चेम्बर आहे की नाही ते पहिलं सिध्द करा.

**प्रमोद सामंत :-**

आहेत ना ८०० चेम्बर घालतात ते लोक त्यांचे खड्डे बुजवुन टाकायचे चेम्बर बनवायचे नाही माझा एकच विषय आहे ते लोक जे चेम्बर बनवतात ते परमनंट चेम्बर बनवतात मिरा भाईदर शहरात त्यांनी ८०० चेम्बर बनवायला घेतली आहेत हा विषय आहे ते ८०० चेम्बर तुम्हाला हवी आहेत मला ते सांगा चेम्बर नको हवेत.

**रोहिदास पाटील :-**

सिस्टम होईल की नाही?

**प्रमोद सामंत :-**

नाही होणार ते बघतील ५०० मीटरची केबल आहे ५०० वरती चेम्बर टाका कशाला ५० मीटर चेम्बर आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सिस्टम तसे आहेत का?

**दिपक खांबित :-**

चेम्बर १०० ते १५० मीटर वर असणार आहे.

**प्रमोद सामंत :-**

५० मीटर, ६० मीटर, ७० मीटर वर चेम्बर आहेत त्यांची.

**दिपक खांबित :-**

असतात ना तलावाची तेवढे असतात

**मुन्ना सिंह :-**

जैसा उनको सुचना मिला वैसा उन्होंने चेम्बर बनाया।

**प्रमोद सामंत :-**

साहेब, एमटीएनएल चं झाकणं तुटलं तर महिनाभर लागत नाही आता ते ५०-५० मीटर वर चेम्बर आहेत तर ते लागणार आहे? आपण जे.ई. ला सांगायचं. जे.ई. एक्झीक्युटीव्ह ला सांगणार एक्झीक्युटीव्ह त्यांना फोन करणार अशी सगळी सिस्टम आहे ती मग त्यांना लेखी पत्र देणार जर हे चुकीचं असेल तर त्यांच्यावर काय कारवाई केली जाईल याच्याबद्दल माहिती द्या.

**मा. सभापती :-**

आपण ह्याचा खुलासा आपण आयुक्त साहेबांकडे करुया.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त साहेब आदेश देतील कारवाई बद्दल माहिती असेल ना.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहब, सामंत साहब ने बोला स्पीच मे की स्थायी समिती का अपमान होता है।

**मा. सभापती :-**

आप बार बार बोल रहे है लेकीन यह अपमान की बात नही है।

**प्रमोद सामंत :-**

सिस्टम का बात है। अपमान का बात नही है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जब स्थायी समिती मे एक साल के बाद प्रश्न उठता है एक भी सन्मा. सदस्य आवाज उठाता है यह सवाल है। उसके जवाब मे वह सवाल पूरे स्थायी समिती का हो जाता है। सावंत साहब को पिछली बार पुछा था की, ॲग्रीमेंट के अंदर केबल डालने का और चेम्बर खोदने का यह अलग अलग एन्ट्री है या नही है। तभी खांबित साहब ने बोला था यह अंडरस्टुड है। अंडरस्टुड के दिमाख उनके पास है ॲग्रीमेंट हमने मांगा या अभीतक ॲग्रीमेंट नही बताया गया।

**मा. सभापती :-**

अभी हम जा रहे है ना कमिशनर साहब के यहाँ तभी चर्चा करेंगे। अभी मिटींग चालु होने दो।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पिछली बार बात हुई थी हम डिसकस करेंगे आयुक्त साहब के साथ चर्चा करेंगे तो यह फर्ज बनता था इस मिटींग मे आके हमको चर्चा करके बुलाके क्या हुआ? तभी यह बात थी अभी यह बात है।

**विलास ढगे (उपायुक्त (मु.)) :-**

खांबित साहेब, ॲज ईट ईज त्यांची परवानगी लॅप्स झालेली आहे. परवानगी रद्द झाल्यामुळे ते काम तात्काळ बंद करणे आणि आता पावसाळ्यापूर्वी त्यांना परवानगी न देणे हा भाग आहे आणि जी कामं अर्धवट आहेत किंवा जिथे धोका निर्माण होणार आहे. ती रिस्ट्रोरेशनच काम तात्काळ करायला त्यांना लेखी सुचना द्या.

**प्रमोद सामंत :-**

त्यांना नका देऊ सुचना. मग ते चेंम्बर बनवणार. तुमचे चेंम्बर राहिले. साहेब, परिवहनचा विषय. परवा ॲक्सीडन्ट झाले. पहिवहनच्या बसने दोन मुलांना उडवले. त्याच पुढे काय झाल? त्या मुलांना बघायला आपल कोण माणूस बघायला गेलेल. कोणीची चुक होती? त्याबद्दल जरा सांगा.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. शुक्रवारी जो ॲक्सीडेन्ट झाला. एम.बी.एम.टी. ची बस होती. सुर्या कॉम्पलेक्स सेंटरच्या बाजूला ते बाईकस्वार होते. दोघेपण ते बाईकस्वार त्या गाडीवर जाऊन आदळले. त्याच्यामधला एक सिरीयस होता. आणि एक कमी जखमी होता. कमी जखमी होता त्याला भगवतीमध्ये ट्रिट करुन घरी सोडण्यात आले. जो जास्त सिरियस होता तो एक दिवस कोमामध्ये होता. दुसऱ्या दिवशी थोडे हात पाय हलवले. तर त्याची ट्रिटमेंट चालू आहे.

**मुन्ना सिंग :-**

कौन से हॉस्पीटल में?

**दिपक सावंत :-**

भगवती हॉस्पीटल में।

**मुन्ना सिंग :-**

उसमें गलती किसका था?

**दिपक सावंत :-**

बाईकस्वारची चूक होती.

**मुन्ना सिंग :-**

आपने कैसे देखा?

**दिपक सावंत :-**

मी स्पॉटवर गेलो होतो ना.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, तुम्ही चुकीची माहिती देता. मी इमिजिएट साहेबांना भेटलो होतो. मला पण त्यांनी बोललेल खर वाटल. पण नंतर वस्तुस्थिती बघितली तुमच्या प्रभागातली घटना आहे. मी सांगतो कुठल्या बाजूने बस आली होती. जांगिडच्या रोडवरुन सिल्व्हर पार्क वरुन बस आली. आणि पिलरच्या अगोदर बसने टन मारला. आणि त्याने पिलरच्या अगोदर बसने टन मारला. आणि बाईकवाले ड्रायव्हर साईडला जाऊन आदळले. म्हणजे जिथे ड्रायव्हरला दिसते त्या ठिकाणी जाऊन ते आदळले. १०० टक्के चूक त्या बस वाल्याची आहे. त्याच्यावर कारवाई काय करणार ते तुम्ही सांगा. ठिक आहे. तुम्हाला काही लक्षात आल नसेल ते मी समजू शकतो पण ही चूक त्या बसवाल्याची आहे. आणि आपण बहुतेक प्रोव्हिजन बजेटमध्ये ठेवलेली आहे. त्यामुलाला लागल आहे. तर महापालिकेतर्फे आपण काय मदत करणार तेवढ सांगा. आता सांगा. आणि ते बसवाले ती बस सोडून निघून गेले. साहेबांनी चूकीची माहिती मला दिली आणि आता एवढ्या सभागृहाला सुध्दा चूकीची माहिती देता यासाठी हा विषय मी इथे घेतला. अशी चूकीची माहिती प्रत्येक प्रशासन अधिकारी महापालिकेला चुकीची माहिती देण्याचे काम करीत असतो. तर कृपया कोणी चूकीची माहिती देऊ नका. माझी नम्र विनंती आहे तुम्हाला.

**दिपक सावंत :-**

त्याला पोलिस घेऊन गेले. ते पळून नाही गेले.

**प्रमोद सामंत :-**

मला चूकीची माहिती आहे. मी मान्य करतो. पण सभागृहाला चूकीची माहिती देऊ नका. आणि त्या बसवाल्याला शिकवा. त्यांची ट्रेनिंग घ्यायला सांगा की त्याने पूर्ण टन मारून आल पाहिजे. मला आणखीन दुसऱ्या विषयावर बोलायच आहे की, मिरा भाईंदर शहरात रिलायन्सचे टॉवर्स आहेत. तुम्ही मान्य तरी करा चूकीची माहिती दिलेली.

**दिपक सावंत :-**

पोलिस पंचनामा आहे. आणि त्याच जे भरपाईचे म्हटले. भरपाईचा प्रस्ताव मी आयुक्तांकडे सादर करतो.

**प्रमोद सामंत :-**

ठिक आहे. रिलायन्सचे मोठे-मोठे टॉवर आहेत. आपल्या शहरामध्ये. अगदी रस्त्याच्या मध्यभागी टॉवर आहेत. तर त्याच टॉवरची साईज कमी करण्याच बऱ्याच ठिकाणी चालू आहे. माझ्या माहिती प्रमाणे त्याने एक टॉवर कमी केला आहे. बाकी टॉवर कधी कमी करणार आहेत? आपण त्यांचा फॉलोअप किती घेतो? ते जरा सांगा. आणि कधीपर्यंत सगळे टॉवर कमी होणार. कारण टॉवर कमी झाले तर हा विषय असा होणार नाही.

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपल्या महापालिके हद्दीत दोन असे रस्ते आहेत. जिथे रिलायन्सचे टॉवर आहेत. आणि त्यांची साईज खूपच मोठी आहे. एकतर गोल्डन नेस्टचा रस्ता आणि दुसरा हटकेशचा ग्रीन कोर्टच्या समोरचा रस्ता. परंतु हे जेव्हा टॉवर झाले तेव्हा महापालिकेची परमिशन घेतली. आणि परमिशन घेऊन ४-५ वर्षामध्ये रस्ता तयार केल्यामुळे आपल्याला अडचणी व्हायला लागले. त्यावर विक्रम कुमार साहेब असताना त्यांच्या बैठका घेतल्या आणि हे टॉवर जे आहे. आमच म्हणन अस होत की, हे केबल येतातना घोडबंदर ते रिसीव्हींग स्टेशन आहे. तिथपासून केबल टाका. आमच्या हद्दीपर्यंत म्हणजे सृष्टीपर्यंत केबल टाकल्यानंतर काढून टाका. आणि त्याचा खर्चही खूप येतो आणि ह्याची परमिशन नाही. एस.टी. लाईनला परमिशन नाही. त्यामुळे आपण अस ठरवल की ते ४ कि.मी. करायची. जस मुंबईमध्ये आहे. हे फक्त चार कि.मी. चे आहेत. सिल्व्हर पार्कच्या समोर आणि सृष्टीच्या रोडवर लहान आहेत. त्याप्रमाणे आपले एकूण सात टॉवर आहेत. ते लहान करायचे आहेत. त्यांच्यातला पहिला ह्या रस्त्यावर तीन आहेत. आणि गोल्डन नेस्टच्या रस्त्यावर चार आहेत. तर ह्यांनी त्यांची सर्व सॅन्शन घेऊन मंजूरी झालेली आहे. त्यातला एक केलेला आहे. पूढचे तीन टॉवर जे आहेत, हटकेशचे त्याच्यावर मार्किंग केलेली आहे ते मी उद्या जाऊन बघतो. त्यांनी मंजूरी वैगेरे घेतलेली आहे. पावसाळ्यानंतर डिसेंबर पासून तीन टॉवरच आणि गोल्डन नेस्टच्या चार टॉवरच असे सात टॉवर आहेत त्याचे डिसेंबर मध्ये त्यांनी प्रोग्रॅम दिले आहेत. त्यामुळे डिसेंबरमध्ये सुरु करू.

**प्रमोद सामंत :-**

म्हणजे हा सृष्टीचा टॉवर आणखीन कमी होणार आहे की नाही.

**दिपक खांबित :-**

सृष्टीचे नाही. हे जे मोठे ४० फुटाचे आहेत ते फक्त.

**मा. सभापती :-**

सृष्टीचा सर्कलला आहे तर तो थोडा फार कमी करायला लागेल.

**प्रमोद सामंत :-**

पण होईल का तो?

**दिपक खांबित :-**

काहीतरी आपण करु.

**मा. सभापती :-**

तिकडचा कमी करायला पाहिजे. कारण तिथला टर्न खूप बेकार आहे .................

**प्रमोद सामंत :-**

तो एकदम सेन्सेटिव्ह टर्न आहे. त्या टर्नवर नेहमी ॲक्सीडेंट होतात. कधीकधी आम्ही पण चूकीच्या रस्त्याने जातो. त्यामुळे तेथे काहीतरी दिशादर्शक फलक लावले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

मला वाटते त्या रस्त्यावर वाहतुकीची परमिशन घेऊन स्पीड ब्रेकर टाकूया.

**प्रमोद सामंत :-**

तुम्हाला परमिशन मिळेल त्यावेळी मिळेल. पण तुम्ही आधी स्पीड ब्रेकर टाका. तुमच्यावर कुठून कोण कारवाई होणार नाही. स्पीड ब्रेकर टाकून घ्या. आणि अशाच प्रकारचा चूकीच एक वाहतूक बेट आमच्या अयप्पा मंदिराकडे बनलेला आहे. त्याच्यावर अजून कारवाई झालेली नाही.

**दिपक खांबित :-**

मा. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर असा डिसिजन घेतला की, सद्यस्थितीमध्ये तो बांधलेला आहे. तो वाहतुकाचा अभिप्राय घेऊ या. पण वाहतुकवाल्यांनी सांगितल सद्यस्थितीत वाहतुकीतून रस्ते निर्माण होत नाही.

**प्रमोद सामंत :-**

वाहतुक विभागाने जर चुकीच सर्टीफाय केल तर त्याला कोण जबाबदार असणार आहे? ॲक्सीडेंट होणार तर त्याला कोण जबाबदार असणार? वाहतूक विभाग की आपण दिलेली परमिशन?

**दिपक खांबित :-**

त्याची चौकशी करुन जबाबदार ठरवल जाईल.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब तो चूकीच्या ठिकाणी बनलेला आहे. तर तो योग्य ठिकाणी बनवावा. साध्या माणसाला सुध्दा कळत की तो चूकीच्या ठिकाणी बनलेला आहे. दोन मुख्य रस्ते आहेत. एक कॅनरा बँककडून येणारा आणि दुसरा सरळ रस्ता.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २०, भाईंदर पूर्व जैसलपार्क चौपाटी येथील विसर्जन घाट दुरुस्ती व नुतनीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, १० तारिख को मैंने लेटर दिया था, और पिछली बार भी यह बात हुआ था की, कोई भी गोषवारा आए उसमें जो भी अंदाजपत्रक तयार किया गया है, वह सभी अंदाजपत्रक सभी सदस्य को मिले। अंदाजपत्रक पढे बिना आप किस हिसाब से किस सर्कल तक पहुँचे है। वह सभापती, स्थायी समिती सदस्यों को हा या ना बोलना बिलकुल गलत बात है। और पिछली बार बात हुई थी। रितसर यह नियम भी है। अंदाजपत्रक मिलना चाहिए। इसका अंदाजपत्रक कहाँपर है? यह लेटर मैंने आपको दिया है। इनको दो दिन बाद मिला तो हम स्टडी कर पाए। सिर्फ रबर का सिक्का बनाके रख देंगे तो कैसे चलेगा। अंदाजपत्रक पढे बिना हम इसको कैसे पास करे? मैंने नगरसचिव को लेटर दिया था।

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. अशी काही पध्दत नाही आहे की, अंदाजपत्रक द्यायच अस. हा टेक्नीकल भाग असतो. स्थायी समितीचा आपण अंदाजपत्रक असते त्याची आपण मंजुरी घेतो. आणि अशी पध्दत असते की, तुम्हाला काही बघायच असेल तर तुम्ही आम्हाला विचारु शकतो. काय असेल ते किती लांबी आहे, किती रुंदी आहे? ही आजपर्यंतची टोटल आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, यह दो दिन पहले हमने अंदाजपत्रक मांगा है। अगर आपको देना होता तो आप मुझे भिजवा देते। आपने दिया भी नहीं मुझे। मैंने बोला की, मुझे अंदाजपत्रक मिलना चाहिए। जहाँ तक पध्दत की बात है की, यह पध्दत है की नहीं। अगर आपने अंदाजपत्रक तयार किया है। उसवक्त नहीं होता तो शायद आपने गलत अंदाजपत्रक बनाने के कारण से मुझे स्टडी करना पडा और विक्रम कुमार साहब थे तभी दो करोड का फायदा हुआ। अगर एक अंदाजपत्रक में गलती से दो करोड का फायदा हुआ। उसका मतलब

अधिकारी कितने मिले हुए है। कितने गलत काम करते है। अगर ऐसा है, एक योजना में दो करोड का फायदा हो रहा है तो ऐसे अधिकारी की संपत्ती जांच करो। कारण क्या है की, अगर हमको अंदाजपत्रक मिला नहीं तो यह क्या कर रहे है? अंदाजपत्रक दे नहीं रहे है। बिना स्टडी के हमको हा बोलने के लिए बोल रहे है। ठेकेदार मिले हुए है। ठेकेदार से मिले हुए है। स्टडी करने को देते नहीं है।

**मा. सभापती :-**

आपको जो जानकारी चाहिए वह लिजिए। आप इसके उपर ऐसा होना चाहिए यह सब बात मत करो।

**राजेंद्र जैन :-**

साहब ने खुद ने ही बोला विहित है।

**मा. सभापती :-**

उनके ऑफीस में जाकर खूद टोटल जानकारी लिजिए।

**राजेंद्र जैन :-**

अंदाजपत्रक, इस्टीमेंट देने का पिछले स्थायी समिती का इस्टीमेंट मांगा था। पंधरा दिन हूए लेटर उनके पास पडा है। अभी तक इस्टीमेंट नहीं मिला है। अब बोलिए क्या करेंगे? में आपको लेटर दिखाता हूँ। मैंने मांगा है। पिछली स्थायी समिती में जो भी गोषवारा पास किए है सबके अंदाजपत्रक मुझे दिए जाए। एक भी अंदाजपत्रक मुझे मिला नहीं है।

**दिपक खांबित :-**

देऊ ना साहेब.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

देना चाहीए। यहाँ समिती मे इकठ्ठा करके देना चाहीए स्टडी करने के लिए।

**दिपक खांबित :-**

आप उसका पैसा भरीए हम दे देंगे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप पैसा मांगो ना मैने किधर मना किया है?

**दिपक खांबित :-**

लेकीन उसका प्रोसेस मे है ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपके पास मे लेटर आया होगा ना। मा. सभापती महोदय को बोल रहा हूँ। मैने इनको लेटर दिया है रेकॉर्ड पर है मुझे इसके अंदाजपत्रक दिए जाए। १५ दिन से लेटर पडा है आपके पास मे अभीतक मुझे जवाब नही मिला है।

**मा. सभापती :-**

ठिक है डॉक्टर साहब आपको जानकारी दि जाएगी। जो आपने बोला है सिधे इन्क्वायरी करो यह सब प्रोसिडींग से डिलीट कर दो।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

निकाले कैसे? साहब मेरी बात सुनिए एक केस के अंदर २ करोड का फरक निकलता है इसका मतलब पिछली बार भी यहाँपर प्लास्टर की बात हुई थी मै कमिश्नर साहब से मिला कमिशनर साहब ने बोला की अंदाजपत्रक............

**बर्नड डिमेलो :-**

डॉक्टर साहब सभापती साहब आपको बोले रुलिंग दि जाएगी, आपको जवाब दिया जाएगा फिर भी आप..............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अंदाजपत्रक पर चर्चा यहाँपर होनी है।

**मा. सभापती :-**

अभी खुलासा हुआ।

**दिपक खांबित :-**

जैन साहेब, दिशाभुल करतात आणि खोटे आरोप करत आले एकात्मिक नाला प्रकल्प हाती घेतला सुवर्ण जयंती मध्ये त्याला मा. महासभेने मंजुरी दिली त्याचं इस्टीमेट जे केलेलं आहे त्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक केली होती. त्या अंदाजपत्रकाला मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्यांनी तांत्रिक मंजुरी दिल्यानंतर राज्य शासनाने आपल्याला ५० टक्के पैसे दिले. १७८ कोटी पैकी ८९ कोटी दिले आणि बाकीचे ८९ कोटी आपण घातले आणि ते टेंडर काढले आणि हे बोलतात इस्टीमेट मध्ये जी भिंत होती नाल्याच्या भींती त्याला प्लास्टरचं आयटम देता ते चुकीचं आहे तर ते टेक्नीकल सॅक्शन आहे ते काय खांबित ने एकट्याने केलेलं नाही खांबित प्रत्येकाला हे करुन लोकांची दिशाभुल करत नाही हा आरोप करु नका माझ्यावर ते इस्टीमेट मी केलेलं नव्हतं तांत्रिक सल्लागाराने केलं होतं त्याला मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी तांत्रिक मंजुरीला दिली होती त्यानंतर विषय झाला विक्रम कुमार साहेबांकडे की हे नाले आहेत त्याला

आपण प्लास्टरींग करु नये मी त्यांना तेच सांगितलं सजेशन केलं साहेब हे चांगलं काँक्रीट आहे. मी आणि बारकुंड साहेबांनी त्याचं रिपोर्टींग केलं त्याच्या म्हणण्यावर झालेलं नाही आम्ही रिपोर्टिंग केलं तांत्रिक दृष्ट्या की ह्याला २५ चं काँक्रीट आहे ह्याला प्लास्टर नाही केलं तरी हरकत नाही त्यामुळे साहेब बोलले हे प्लास्टरींग काढून टाकू आणि प्लास्टरींग काढल्यामुळे बचत झाली हे काय डॉक्टर साहेबांनी सांगितलं म्हणून झालेलं नाही.

**बर्नड डिमेलो :-**

भाईंदर (पूर्व) येथील जैसलपार्क चौपाटीवर श्री. गणेश मुर्ती, दुर्गामाता / दशमादेवी विसर्जन, छटपूजा तसेच इतर धार्मिक विधीचे विसर्जन करण्यात येते. सदर ठिकाणी असलेला धक्का हा खाडीमध्ये खोल नसल्याने विसर्जन वेळी अपघात होतात. सदर जागा सी.आर.झेड ने बाधित असल्याने सदर ठिकाणी विर्सजन घाट बांधणे करीता मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी पर्यावरण विभाग यांना दि. ३१/०१/२०१२ रोजी सदर ठिकाणी विसर्जन घाटाचे बांधकाम करण्यास मंजूरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्या अनुषंगाने पर्यावरण विभाग यांनी दि. २४/०२/२०१२ रोजी पत्राद्वारे फक्त दुरुस्ती व नूतनीकरण करणे करीता परवानगी दिलेली आहे.सदर ठिकाणी विसर्जन धक्का रुंदीकरणास परवानगी नाही.

वरील मंजूरीप्रमाणे भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटीकडे अस्तीत्वात असलेल्या विसर्जनघाटाची दुरुस्ती नूतनीकरण करणेसाठी दगडांच्या सहाय्याने भराव करुन त्यावर क्राकीटिंग चे काम करणेकरीता खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी येथील विसर्जनघाटची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु. ३५,११,६००/- |

सदर कामासाठी सन २०१३-१४ या वर्षात "भाईंदर (पूर्व) / पश्चिम धक्का" या लेखाशिर्षात रु. ५० लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

सदर *कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.*

**प्रमोद सामंत :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, डॉ. साहेबांनी जे आता सांगितलं की, त्यांनी पत्र दिलं की, अंदाज पत्रक बघायला मिळायला पाहिजे तर मिटींगच्या अगोदर बघायला मिळेल का?

**दिपक खांबित :-**

हो मिळेल ना.

**प्रमोद सामंत :-**

सावंत साहेब तुमची माहिती आली का?

**दिपक सावंत :-**

हो आली.

**प्रकरण क्र. २० :-**

भाईंदर पूर्व जैसलपार्क चौपाटी येथील विसर्जन घाट दुरुस्ती व नुतनीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १९ :-**

भाईंदर (पूर्व) येथील जैसलपार्क चौपाटीवर श्री. गणेश मुर्ती, दुर्गामाता / दशमादेवी विसर्जन, छटपूजा तसेच इतर धार्मिक विधीचे विसर्जन करण्यात येते. सदर ठिकाणी असलेला धक्का हा खाडीमध्ये खोल नसल्याने विसर्जन वेळी अपघात होतात. सदर जागा सी.आर.झेड ने बाधित असल्याने सदर ठिकाणी विर्सजन घाट बांधणे करीता मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी पर्यावरण विभाग यांना दि. ३१/०१/२०१२ रोजी सदर ठिकाणी विसर्जन घाटाचे बांधकाम करण्यास मंजूरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्या अनुषंगाने पर्यावरण विभाग यांनी दि. २४/०२/२०१२ रोजी पत्राद्वारे फक्त दुरुस्ती व नूतनीकरण करणे करीता परवानगी दिलेली आहे.सदर ठिकाणी विसर्जन धक्का रुंदीकरणास परवानगी नाही.

वरील मंजूरीप्रमाणे भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटीकडे अस्तीत्वात असलेल्या विसर्जनघाटाची दुरुस्ती नूतनीकरण करणेसाठी दगडांच्या सहाय्याने भराव करुन त्यावर क्राकीटिंग चे काम करणेकरीता खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी येथील विसर्जनघाटची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु. ३५,११,६००/- |

सदर कामासाठी सन २०१३-१४ या वर्षात "भाईंदर (पूर्व) / पश्चिम धक्का" या लेखाशिर्षात रु. ५० लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

दि. ०७/०३/२०१३ रोजी दै.जागरुक टाईम्स व दै. फ्रि प्रेस जनरल व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फुटपाथ, गटारे व नाले यावरील स्लॅब मध्ये आर.सी.सी झाकणे बसविणे** | दि. ०२/०५/२०१३ | दै. जागरुक टाईम्स व दै. फ्रि प्रेस जरनल दि. ०७/०४/२०१३ | दि.०८/०४/२०१३ |

| SR. NO. | DESCRIPTION | PER | AMAR CONCRETE<br>B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR | PIYUSH ENTERPRISES<br>B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR | ESSBE ENTERPRISES<br>B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ITEM NO. 1<br>Providing and Fixing M-30 grade of RCC Concrete Covers on gutter / nalla / footpath of following various Sizes for pedestrian as per required specification etc. Complete in MBMC MBMC Area.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc.) | | **दर वाटाघाटीनंतर** | | |
| | A) RCC Concrete Cover (for pedestrian Use) | SMT | 17000.00 **3500/-** | 20000.00 | 22000.00 |
| | B) RCC Frame | SMT | 21000.00 **4500/-** | 23000.00 | 25000.00 |
| 2 | ITEM NO. 2<br>Providing and Fixing M-30 grade of RCC Concrete Covers on Main Road of following various Sizes as per drawings and required specification etc. Complete in MBMC MBMC Area.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. ) | | **दर वाटाघाटीनंतर** | | |
| | A)RCC Concrete Cover (for Main Road Use) | SMT | 25000.00 **5000/-** | 26000.00 | 29000.00 |
| | B) RCC Frame | SMT | 29000.00 **7000/-** | 31000.00 | 35000.00 |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. अमर कॉंक्रीट** यांनी सादर केलेली **वरील कमी दराच्या (दर वाटाघाटीनंतर)** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात

येत आहे. ठेकेदाराकडून मंजूर दराने वार्षिक मुदतीने झाकणे बसवून घेण्यात यावीत. वरील दरानुसार संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गटारे, फुटपाथ, नाले, स्लॅब मध्ये अर्थसंकल्पात वेळोवेळी तरतूद करुन आवश्यकतेनुसार झाकणे बसवण्यात यावीत. तसेच प्रत्येक प्रभाग समिती मध्ये २०० झाकणे उपलब्ध करुन ठेवण्यात यावीत. महानगरपालिकेमार्फत बांधण्यात येणारी नविन गटारे, स्लॅब या मध्ये देखिल झाकणे व फ्रेम सदर ठेकेदाराकडून बसवून घेण्यात यावेत.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा ठराव देते वेळी सगळ्यांनी गांर्भियाने ऐका. हे एवढं मोठं काम आहे कामाची रक्कम किती मोठी याला महत्व नाही पण स्वरुप किती मोठं ह्याचं सगळ्यांना ह्या दोन-तीन महिन्यात अनुभव आलेला आहे. शहरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्यावरची झाकणं तुटली अनेक माणसं मुलं त्या खड्डयात पडली. कोणाच्या पायाला लागलं, कोण फाटलं हे केलं सगळं झालं मा. महासभेत चर्चा झाली आता ही ज्यांना आपण ते काम देतो ते खरोखर कामाच्या लायक ठेकेदार आहेत की नाही? एवढं एक उत्तर द्या.

**दिपक खांबित :-**

साहेब, याबाबत आम्ही एक माहिती घेतली मुंबई महानगरपालिका, वसई महानगरपालिकेचे सुध्दा हेच सप्लायर आहेत पावती फाडुन...............

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला ह्या सभागृहाला त्या महासभेतली ती शिफारस नको. दे आर क्वालिफाईड ऑर नॉट? त्यांना त्यातल तंत्र समजत की नाही? जे माणुस चालेल त्याच किती वजन जे सिमेंटचं बनवणार, लोखंडाचं बनवणार जे बनवायचं ते पण ते सहन करेल की नाही ज्याच्यावरुन पाट्याची गाडी जाईल त्याच्यावर ते रॉड किती साईज चे असतील? मी तुमचं सभागृहात लक्ष वेधतो साहेब मी सरळ धन्यवाद देतो. या महापालिकेतल्या सगळ्या अधिकाऱ्यांना धन्यवाद देतो खारीगावात गावदेवी मंदीरचा सोहळा होता खांबित साहेबांसहीत, सभापती साहेबांसहीत सगळ्यांना विनंती केली होती जे काम महिन्या-महीन्याने होणार नाही ते काम पाच दिवसात, आठ दिवसात डांबर टाकणे रिलायन्सचे सुध्दा २५० चे ६ खांबे टाकले असं कधी होतच नाही. देवाचं काम म्हणून त्यांनी केलं एक चेम्बर त्याला पुन्हा पुन्हा सांगुन जे बनवलं. बरोबर ते मिरवणुकीच्या आदल्या दिवशी चेम्बर तुटलं चेम्बरचा कान गेला खाली चार हजाराची ती मिरवणुक झाली ती मिरवणुक दोन्ही बाजुंनी बाजु विभागून चालवायला लागली. इथ एका बाजुने हरीभाऊ तिचे व्यवस्थापक म्हणुन उभे राहिले काय दशा? ज्याला आपण ठेका दिला होता त्याला तो किती काळ लांब ठेवावा कितीचा आय बीम वापरावा, काय लोखंड वापरावं हे शास्त्र माहित आहे की नाही? झाकण ३-४ टाईपची आहे त्यांना जे ठेका द्यायचा ते देऊ दे. पण तो ठेकेदार सक्षम असला पाहिजे ना. कोणीतरी येतो आणि तो ठेकेदार बनतो असं आहे की, काय आहे ते?

**दिपक खांबित :-**

आपण ह्या वेळेला जी यशोदा कंपनी आहे. ह्यांची स्वतःची जागा आहे. स्वतःचा फ्लॅट आहे अशा लोकांना टेंडर मागवलं होतं आणि तुम्हाला सांगतो त्याच्याकडुन झाकणं वगैरे ॲन्टीचेंम्बर वगैरचं झाकण ठरलेलं आहे आणि खाली मा. महापौरांची गाडी असेल त्याच्या पाठीमागे सुध्दा हेवी डिक्की आणि लाईट अशी दोन झाकणं आपण टेस्टींग सुध्दा करुन घेतली. तुम्ही मागच्या मिटींगला बोलले होते की आम्हाला झाकणं दाखवा टेस्टींग करायचं तर आपण टेस्टींग सुध्दा करुन घेतली.

**रोहिदास पाटील :-**

झीरो कम्प्लेंट असेल तर आनंद आहे त्यामध्ये महापालिकेची शान वाढेल.

**बर्नड डिमेलो :-**

काका, तुमच्याच विचारानूसार मी म्हणतो तुम्ही जो विषय काढला त्यावर आपली दोन-तीन वेळा चर्चा झाली आहे तर आता हे पण आपण करु शकतो स्थायी समिती आहे जर आरसीसी ला सगळ्यांचा नकारच असेल तर आपण बऱ्याच ठिकाणी बघितलेलं आहे. शरद भाऊंना, माहित आहे ती लोखंड कशी बनवली आहेत त्याचा इंचाचा गॅप कसा असावा. ते चोरी करता येऊ नये त्याचा लॉक कसं राहील उघडायची सोय काय असेल? आता आपले नगरसेवक नरेश पाटील वॉर्ड क्र. ३० मध्ये त्यांचा मला फोन आला होता की माझ्या वॉर्ड मध्ये सफाई कामगारच ती झाकणं आपटतात. त्याच्यातले सलिया काढतात आणि विकतात. आता ह्या जर चोऱ्या रोकायच्या असतील तर आपण हे करायला पाहिजे आरसीसी साठी पैसा खर्च करणेपेक्षा जर १० रुपयांची झाकणं बनवतो त्याच्यामध्ये ४० रुपये संपवा पण तसा प्रकार करु नका.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्याबद्दल आपलं काही घेणं देणं नाही इनटाईम मिळणे गरजेचे आहे त्या गोपीमहल हॉटेल जवळ अडीच महिने झाले चेम्बर उघडं आहे बस अशी टर्न घेते लोकांना जायला मिळत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

पण आता जो निर्णय घेतला आरसीसी चा त्याच्यामध्ये खांबित साहेब बदल करता येतो का?

**दिपक खांबित :-**

तुम्ही जे म्हणता ते मागवून घेवू आणि कारवाई करु.

**बर्नड डिमेलो :-**

त्याच्यामध्ये वाढ झाली तर देणार ना पण एकदाच कामाचं झालं तर पैशाची बचत होईल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

खांबित साहब से पहले बात हुआ है और उन्होंने हाँ भी बोला था की, इस मामले मे यह अक्सर वहॉ भी गया था उसकी पाहणी भी कर ली जाए, चोरी हो गया। ढक्कन चला गया। इसका सजेशन क्या दिया था और जो बिलकुल सही है की इस कंपनी को ठेका दिया जाए उसीको ही ८०० साईड ९०० साईड उसी साईड डिमोशन दिया जाए। उसको उसे सर्व्हे करते रहे की, यह ढक्कन वहाँपर है यह मैने सजेशन दिया था। इसको पैसे थोडे ज्यादा लगेगा लेकीन चोरी का तुटनेका झंझट खतम हो जाएगा।

**दिपक खांबित :-**

आपने गये साल मे सजेशन दिया था। वैसे टेंडर मे भी कंडीशन थी, ॲग्रीमेंट मे भी कंडीशन थी। गये साल मे जितने भी ढक्कन तुटे चारों ठेकेदारोंने सब से यह कंडीशन शिथील नही की, उन्होंने सर्व्हे नही किया, रिपोर्ट नही दिए करने १० टक्का पैसा आने का काटा है। कमसे कम २० से २५ लाख रुपये हमने उनका आनेका काटा है और यह कंडीशन यह टेंडर मे भी है।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २१ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. २० :-**

दि. ०७/०३/२०१३ रोजी दै.जागरुक टाईम्स व दै. फ्रि प्रेस जनरल व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात फुटपाथ, गटारे व नाले यावरील स्लॅब मध्ये आर.सी.सी झाकणे बसविणे** | दि. ०२/०५/२०१३ | दै. जागरुक टाईम्स व दै. फ्रि प्रेस जरनल दि. ०७/०४/२०१३ | दि.०८/०४/२०१३ |

| | | | AMAR CONCRETE | | PIYUSH ENTERPRISES | ESSBE ENTERPRISES |
|---|---|---|---|---|---|---|
| SR. NO. | DESCRIPTION | PER | B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR | | B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR | B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR |
| 1 | ITEM NO. 1<br>Providing and Fixing M-30 grade of RCC Concrete Covers on gutter / nalla / footpath of following various Sizes for pedestrian as per required specification etc. Complete in MBMC MBMC Area.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc.) | | | दर वाटाघाटीनंतर | | |
| | C) RCC Concrete Cover (for pedestrian Use) | SMT | 17000.00 | **3500/-** | 20000.00 | 22000.00 |
| | D) RCC Frame | SMT | 21000.00 | **4500/-** | 23000.00 | 25000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | ITEM NO. 2<br>Providing and Fixing M-30 grade of RCC Concrete Covers on Main Road of following various Sizes as per drawings and required specification etc. Complete in MBMC MBMC Area. Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M,<br>0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br><br>A)RCC Concrete Cover (for Main Road Use)<br>B) RCC Frame | <br><br><br><br><br><br><br>SMT<br>SMT | दर वाटाघाटीनंतर<br>25000.00 **5000/-**<br>29000.00 **7000/-** | <br>26000.00<br>31000.00 | <br>29000.00<br>35000.00 |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता **मे. अमर काँक्रीट** यांनी सादर केलेली **वरील कमी दराच्या (दर वाटाघाटीनंतर)** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. ठेकेदाराकडून मंजूर दराने वार्षिक मुदतीने झाकणे बसवून घेण्यात यावीत. वरील दरानुसार संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गटारे, फुटपाथ, नाले, स्लॅब मध्ये अर्थसंकल्पात वेळोवेळी तरतूद करुन आवश्यकतेनुसार झाकणे बसवण्यात यावीत. तसेच प्रत्येक प्रभाग समिती मध्ये २०० झाकणे उपलब्ध करुन ठेवण्यात यावीत. महानगरपालिकेमार्फत बांधण्यात येणारी नविन गटारे, स्लॅब या मध्ये देखिल झाकणे व फ्रेम सदर ठेकेदाराकडून बसवून घेण्यात यावेत.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२, निविदेस मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, पहिल्यांदा तुम्हाला निवेदन करायला लागेल. फाटक, भाईंदर (पू.) येथे ४० दशलक्ष इन लाईन डिस्ट्रीक्ट पंपाकरीता पाणी नाही एकतर पहिल्यांदा अनेक वर्ष आपण प्रयत्न करुन किती कोटी रुपये खर्च करुन एक पाईप लाईन टाकून झाली त्याचे प्रात्यक्षित किती वर्ष पूर्वी आपण तो ठराव केला रेल्वे वाल्यांकडून आपण परमिशन घेतलं आणि किती इंचाची पाईप लाईन टाकली टाकल्यानंतर किती दिवस झाले त्याचा परिणाम काय झाला? त्याचा किती फायदा झाला? आमच्या माहितीनूसार दोन वर्षामध्ये एक लीटर पाणी वाढलेलं नाही आणि दोन वर्षामध्ये आपल्या कोट्यवधी रुपयांचा खर्च पाण्याच्या पाईप लाईनचा चाललेला आहे. ज्या स्किमसाठी तुम्ही हे करता त्या स्किमसाठी आपण लाखो रुपये खर्च केला आणि त्याचा तुम्ही इफेक्ट घेतच नाही. त्याच्या आधीच तुम्ही दुसऱ्याची पाच कोटीची मंजूरी मागता याला विरोध करायच काही कारण नाही. पाणी खात्याच मिरा भाईंदरच चेना ते उत्तन कुठचही टोक असेल तिथे तुम्ही जितकी वर्षे राबवाल ..............

**बर्नड डिमेलो :-**

काका तुम्ही बोलले ते बरोबर आहे. परंतु, पाण्याची लोकांना सोय असते. अगर स्पेअरमध्ये काम करुन नाही ठेवल आणि उद्या शहरामध्ये पाणीपुरवठा बंद झाला.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या ह्याच्यावर चर्चा नको. जरा टेक्नीकल चर्चा करुया.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपण भाईंदर ईस्ट आणि वेस्ट साठी जोडण्यासाठी तिथे ही ७०० एम.एम. ची साईज आहे. ७०० एम.एम. च्या लाईनमध्ये तेवढी कॅपेसिटी कमी असल्यामुळे त्याच्यावर होणारा पाण्याचा प्रेशर जास्त वाढत होता त्याठिकाणी आणि त्याठिकाणी सिक्वेन्स कमी आहे. आता आपण काय केल की, ईस्टच्या मध्ये भाईंदर वेस्टची टोटल गरज किती आहे ते सगळ लक्षात घेऊन आपण त्याठिकाणी १३५० एम.एम. ची १० लाखाची पाईन लाईन आपण क्रॉस केली. आर.सी.सी. पाईन अगोदर क्रॉस केला. आर.सी.सी. पाईप मधुन पाणी चांगल जाते. म्हणजे भविष्यामध्ये कधीही ती लाईन तुटता कामा नये. आम्हाला सगळ्यात जास्त तीच भिती होती की ही लाईन रेल्वे खाली आहे. जर इथे काही फॉल्ट झाला तर काहीच करु शकत नाही. अशी परिस्थती आहे. म्हणून हे काम आपण अरजन्टली करायला घ्यायच होत. हे काम आपण २००२ साली प्रपोज केल होत. पण रेल्वेची परमिशन मिळत नव्हती. त्याच एम.जी.पी.कडे काम दिले होते. त्यांच्याकडून परमिशन झाली नाही म्हणून आपण कामाला हाती घेतल नाही. रेल्वेची परवानगी घेऊन ते काम

आपण नोव्हेंबर महिन्यामध्ये चालू केल. आणि मार्च पर्यंत आपण १३५० एम.एम. ची पाईप लाईन पूर्ण क्रॉस करुन कम्पलीट केल. आणि एप्रिल महिन्यामध्ये त्याठिकाणी क्रॉस कनेक्शन केल आणि पाईप लाईन चालू केली. पाईप लाईन चालू केल्यानंतर आपण त्यामध्ये बघितल की, भाईंदर वेस्ट या भागामध्ये जो शटडाऊन घेतल्यानंतरचा दुसत्या पिरेडमध्ये भयानक पिरेड असायचा. त्या दिवशी आपण बाकी ठिकाणी पाणी पुरवठा हा ४० तासाने ४५ तासानंतर यायचा. पण इथला पाणी पुरवठा हा शटडाऊन झाल्यानंतर ५२ तासापर्यंत जायचा तो कंट्रोलमध्ये येत नव्हता. म्हणजे कंट्रोलमध्ये येण्यासाठी याचा पिरेड कमी करायचा टाकी बंद करुन बघायचा. पण हा भाग केल्यानंतर तास भाडे कमी झाल आहे. ह्याच्यामध्ये दोन ते अडीज तासामध्ये सप्लाय हवरमध्ये फरक पडला आणि दुसर म्हणजे कस झाल जी शटडाऊनच्या नंतर टाकी आपली प्रॉपर चालू व्हायची म्हणजे कमला पार्क ते गोडदेव या जवळपास आल्यानंतर हा फरक त्याच्यामध्ये. हे काम कस होत की, पहिल काम घेतले की, आपण पाईप लाईनच काही मी वाढवला. भविष्यामध्ये चेंज करायची गरज नाही. काही मी एवढच पाणी वाढल. पण हे जे काम आहे हे वेगळ काम आहे. ह्या कामामध्ये कसे काय आहे की, पाणी घ्यायच. संम्प घ्यायचे होते तर आपल्या प्रत्येक टाकीचा संम्प होता. कमला पार्कला सम घेणार, सुदामा नगरला सम घेणार. इतर सेवेन-सेवेनला घेणार संम्पमध्ये होणार आणि पंप करणार. त्या ठिकाणी तीन्ही आपल्याकडे लागणार. तीन्ही ठिकाणच लाईट बिल आल. तिथे ॲडीशनल वाढणार. त्याच्यापेक्षा ही टेक्नोलॉजी ऑनलाईन होणार. ऑनलाईन गोष्टीमध्ये कस आहे की, तुमच येणार पाणी आहे. येणाऱ्या पाणीमधल आतल हेड. हेड वाढल की ऑटोमॅटीक संम्पच्या ऐवजी तो इ.एस.आर.ला हिडींग लवकर होईल. आणि ती टाकी लवकर भरेल. अशा पध्दतीने ही टेक्नोलॉजी होती. आणि ह्या टेक्नोलॉजीला पंप महाराष्ट्र जिवन प्राधिकरणची मान्यता घेतली. त्यानंतर ह्याची निविदा काढली. काम हे गरजेचे आहे. हे आपण तांत्रिक दृष्ट्या त्यांच्याकडून तपासणी केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, ऐकुन घ्या. त्या योजनेवर किती खर्च केला ते सांगितल नाही. जी पंधरा दिवसापूर्वी योजना चालू झाली. त्याच्यावर टोटल खर्च किती झाला?

**सुरेश वाकोडे :-**

तेच एक काम होते. रेल्वे क्रॉसींगच जे काम आहे ना ४ कोटी ३० लाखाच काम होते. त्याप्रमाणे ते काम कम्प्लीट झालेल आहे.

**रोहिदास पाटील :-**

३३ पकडा, ४ पकडा किंवा ५ कोटी पकडा. ५ कोटी कामाच एक्झीक्युशन १५ दिवसापूर्वी झाल. त्याच्यावर तुम्ही पाण्याचा थेंब कुठे वाढवतच नाही. आता शहरामध्ये ५८ ते ६० तासाने शहरावर पाणी चालू आहे. त्यातली कॉन्टीटी वाढणार नाही. त्यामुळे कुठे फरक पडेल याची शक्यता नाही. आणि आता परत तुम्ही ५ कोटी रु. खर्च करता. एकतर तुम्ही डिक्लेर केल. तुम्हाला कोणी राईट्स दिले जे संम्पमध्ये कोट्यवधी रुपये घालवले. संम्पच्या कोट्यवधी रुपयाची आपण मशिनरी आणली ती सगळी वायफळ गेली का? अस ह्याच्यामध्ये डिक्लेर करुन दाखवा महासभेमध्ये की ते सगळ बुडीत खात्यात काढलेल आहे. ते तुमच्या मर्जीवर चाललेल आहे. आम्ही मा. महासभेत ही बोललो. आजही बोललो. एम.जी.पी. वर आमचा विश्वास नाही. या महापालिकेला जितके लुटता येईल तितकं एम.जी.पी. ने लुटले आणि त्याला तुम्ही सहभागी होता का? हे उत्तर पाहिजे. आम्हाला तुम्ही सांगा जे पहिल्यांदा ७०७ चा संम्प वर्कआऊट केला. खर्च सगळा केला तर ह्याला जबाबदार कोण? त्याच्यासाठी अडीच कोटीची मशिनरी आणली. त्याचे तुम्ही काहीच उत्तर दिलेले नाही. कुठे आहे ते सांगा ना. तुम्ही एकटे पाणीखर्च डोक्यावर घेऊ नका. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. कठीण प्रसंग आला तरी त्यालाही आहोत. सुखात आणि दुःखात मा. सभापती साहेब ह्याला विरोध करायचे कारण नाही. पण आजच्या घडीत त्याला आमच्यामध्ये ५ कोटी रु. चा खर्चाला आपण मंजूरी देतो किंवा त्या ठेकेदाराला देतो त्याचे अजून ६ महिने ट्रायल घ्या ना. बर्नड साहेब कुठेही, पूर्व-पश्चिमचा पाण्याची जी सुधारणा झाली, ती त्यावेळच्या टेक्नॉलॉजीने केलेले आहे. उशिर झाला पण आता पश्चिमेला उत्तनपर्यंत पाणी पोहचायला कुठेही अडचण नाही. ही सिस्टम करुन काही आज उपयोगच नाही. एका बाजूने पाणी खेचत राहणार ती सिस्टीम एक वेळ ठरवणार संम्पने जसा फोल ठरवला ....................

**सुरेश वाकोडे :-**

ह्याच्यामध्ये सिस्टम फेल वैगेरे अस नाही म्हणता येईल.

**रोहिदास पाटील :-**

जी सिस्टम चालू झाली त्याच रि-रिडींग घ्या. मा. सभापती साहेब आज हे निश्चित आहे. एका ठिकाणी पाणी वाढवण म्हणजे दुसऱ्या ठिकाणच पाणी कमी करणे. भाईंदर पूर्वेला वाढवण म्हणजे उत्तनला कमी करण. उत्तनला वाढवल म्हणजे मिरारोडला कमी करण. मिरारोडला वाढवण म्हणजे कुठेही. कुठचही ह्या शहरातल अंदाजे पाणी आहे एवढच पाणी फिरवायच. मग तेवढच फिरवण्यासाठी पाणी फिरवायच. मग तेवढच फिरवण्यासाठी पाणी वाढवण्याची एकही शक्यता नाही. मग हे ५ कोटी रुपये आपण खर्च का करतो? ह्याच उत्तर द्या.

**दिपक खांवित :-**

पाणी वाढवायचा आहे ना.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. जे काम आपण बोलता ऑनलाईन गोष्टी ते काम तत्कालीन आयुक्त गायकवाड साहेब आणि आम्ही कापूरबावडीला केले. आणि एम.जी.पी. च ह्याला स्ट्राँग होत होता. परंतु, आज ही ते काम कधी कोणा सदस्याला वेळ नाही. कधी ठाण्याला गेल तर कापूरबावडीला जाताना राईट साईडला आणि येताना लेफ्ट साईडला आपल पंपींग स्टेशन आहे. जवळ-जवळ आपण तिथून ३० ते ३५ एम.एल.डी. पाणी घेतो. तो प्रयोग सक्सेसफुल आहे. हा प्रथम मुद्दा आणि दुसरा जो मुद्दा आहे. जे आपण बुस्टिंग करणार ह्याने पाणी जरी वाढणार नसेल तर शहरात अन इक्वल डिस्ट्रीब्युशन होणार. प्रेशर कमी जास्त आहे. त्यामुळे ऑनलाईन बुस्टिंग केल्याने पाणी समप्रमाणात पाणी उतरण्यास मदत होणार आहे. म्हणून हे काम करण गरजेच आहे.

**रोहिदास पाटील :-**

चूकीच निवेदन करु नका. तुम्ही कापूरबावडीला जे पाणी उचलल त्या पाईप लाईनची क्षमता नव्हती. त्याला बुस्टींग उचलण बरोबर होत. ते आपल्या महापालिकेच्या फायद्याच आहे. त्याच्या खाली जो आयटम आहे. ते तुम्ही मागितलेली परवानगी हे फायद्याच आहे. पण इथे ज्या ठिकाणी तुम्ही लावता त्याच्यात कोणता फायदाच नाही आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

काका, कापुरबावडीला फायदा कसा नाही. एम.जी.पी. ने सजेशन दिल होत. तुम्ही सम्पसाठी जागा घ्या. संम्प घेतल्यानंतर एम.आय.डी.सी. च पाणी झिरो प्रेशरला करा. तिथुन परत पंपींग करा. आज आपण एम.आय.डी.सी. च यूजींग दॅट प्रेशर. १.२, १.३ यूज करतो. त्यांनी १ करोड २ करोड एनर्जी वापरतो. आम्ही पब्लीसीटी नाही केली आणि करायची ही नाही. परंतु, महापालिकेचा फायदा झाला काम हे इमिजिएट झाल. जागा एक्वेंशन करावी लागली नाही. आणि युजींग दॅट प्रेशर जागा त्यामुळे पाईप लाईनची क्षमता होती नव्हती हा भाग तिथे नव्हता. कॅपेसिटी पातलीपाड्यापर्यंत पर्यंत होती स्टेमची. त्यामुळे ते सक्सेस फुल झाल. एम.जी.पी. चा ह्याला स्ट्राँग विरोध होता.

**रोहिदास पाटील :-**

कितीही स्ट्राँग विरोध असु द्या. आम्ही काय म्हणतो की, आजच्या घटनेला तुम्ही पूर्वेकडून पश्चिमेला पाणी उचलायला ५ कोटी रुपये खर्च करता.

**बर्नड डिमेलो :-**

काका, या विषयावर मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. आपण होतो. सर्वांनी केलेल आहे. तर आता भरपूर झाल.

**मा. सभापती :-**

काका, ही सर्व चर्चा मा. महासभेमध्ये झालेली आहे. आता फक्त मंजूरी द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही गफलत करु नका. या रक्कमेला आपण विरोध करत नाही. पण जी रक्कम खर्च करुन जी योजना पूर्ण झालेली आहे. तिच काहीतरी रिडींग तरी घेऊ द्याना. ५ महिने, ६ महिने असेल ना. म्हणून तुम्ही ते होत नाही. लगेच दुसऱ्याला टेंडर देतात. दुसऱ्या टेंडरचे दुसरे ५ कोटी रुपये.

**प्रमोद सामंत :-**

५ महिने ह्या लोकांनी वेळ घेतलेला आहे त्या योजनेसाठी आर्थिक, प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर ५ महिन्याने हा विषय आला तर पाच महिन्याच त्याने रिडींग वैगेरे घेतले असेल.

**बर्नड डिमेलो :-**

पाणी पुरवठा विभागामार्फत विकासकामाकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | **फाटक भाईंदर (पूर्व) येथे ४० द.ल.ली. इन लाईन बुस्टींग पंपाकरिता गृह बांधणे पंपिग मशिनरीचा पुरवठा करणे बसविणे चाचणी देणे व चालू करणे,** | रु. ४,७०,०३,६०३/- |
| | **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | ७.०० % जास्त दराने |
| | **दरवाटाघाटीनंतर** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| | २) मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस | ९.७० % जास्त दराने |
| | ३) मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | १२.६० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| २ | कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची ( क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या हवालानुसार दुरुस्ती करणेबाबत.<br>निविदा भरण्याचा कालावधी तीनदा वाढविण्यात आला. या कालावधीत तीन निविदा प्राप्त झाल्या.<br>१) मे. संदेश पी. बुटाला<br>दरवाटाघाटीनंतर<br>२) मे. न्यु बनास कन्स्ट्रक्शन कंपनी<br>३) मे. देव इंजिनिअरींग वर्क्स | रु. ६१,८२,११५/-<br>७.२० % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>तांत्रिक अर्हता पुर्ण करीत नसल्यामुळे आर्थिक देकार उघडण्यात आले नाही. |
| ३ | साकेत ठाणे येथून मिरा भाईदर येथे २० द.ल.ली. पाणी उचलणे करिता तात्पुरती व्यवस्था करणे.<br>१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>दरवाटाघाटीनंतर<br>२) मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस्.<br>३) मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | रु. २,२४,८०,८००/-<br>७.०० % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१२.०० % जास्त दराने<br>१३.५० % जास्त दराने |

वरीलपैकी अ.क्र. १ मधील मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., अ.क्र. २ मधील संदेश पी. बुटाला, अ.क्र. ३ मधील मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांच्या अंदाजपत्रकीय दरांच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२ :-**

निविदेस मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २१ :-**

पाणी पुरवठा विभागामार्फत विकासकामाकरिता निविदा मागविण्यांत आलेल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | फाटक भाईदर (पूर्व) येथे ४० द.ल.ली. इन लाईन बुस्टींग पंपाकरिता गृह बांधणे पंपिग मशिनरीचा पुरवठा करणे बसविणे चाचणी देणे व चालू करणे,<br>२) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>दरवाटाघाटीनंतर<br>२) मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस<br>३) मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | रु. ४,७०,०३,६०३/-<br>७.०० % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>९.७० % जास्त दराने<br>१२.६० % जास्त दराने |
| २ | कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या हवालानुसार दुरुस्ती करणेबाबत.<br>निविदा भरण्याचा कालावधी तीनदा वाढविण्यात आला. या कालावधीत तीन निविदा प्राप्त झाल्या.<br>४) मे. संदेश पी. बुटाला<br>दरवाटाघाटीनंतर<br>५) मे. न्यु बनास कन्स्ट्रक्शन कंपनी<br>६) मे. देव इंजिनिअरींग वर्क्स | रु. ६१,८२,११५/-<br>७.२० % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>तांत्रिक अर्हता पुर्ण करीत नसल्यामुळे आर्थिक देकार उघडण्यात आले नाही. |
| ३ | साकेत ठाणे येथून मिरा भाईदर येथे २० द.ल.ली. पाणी उचलणे करिता तात्पुरती व्यवस्था करणे.<br>४) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु. २,२४,८०,८००/-<br>७.०० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| | दरवाटाघाटीनंतर | अंदाजपत्रकीय दराने |
| | ५) मे. अे.के. इलेक्ट्रीकल ॲण्ड वर्कस्. | १२.०० % जास्त दराने |
| | ६) मे. ग्रॅव्हीट इजिनिअरींग वर्कस् | १३.५१ % जास्त दराने |

वरीलपैकी अ.क्र. १ मधील मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., अ.क्र. २ मधील संदेश पी. बुटाला, अ.क्र. ३ मधील मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांच्या अंदाजपत्रकीय दरांच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (संगणक विभाग)** तात्पुरत्या स्वरुपात ई-टेंडरींग प्रणाली कार्यान्वित करणेबाबत. प्रकरण क्र. २४, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचे अवलोकन करणे (नगरसचिव विभाग)** झेरॉक्स मशिनसाठी टोनर (शाई) पुरवठा करणेबाबत. प्रकरण क्र. २५, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग)**

**मा. सभापती :-**

हे अवलोकन मान्य करण्यात येत आहे.

**दिपक सावंत :-**

